महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

MCT वार्ता DIGITAL

प्रकाशन: मुंबई सह एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

Maharashtracrimetimes.com | MHCrimeTimes | MAHCrimeTimes | 9803386748 | maharashtracrimetimes@gmail.com

मूल्य २/- रुपये

• संपादक: राकेश शंकर गोरे | वर्ष: १५, अंक: ८, पृष्ठ: ८ | मुंबई, मंगळवार २१ मे २०२४ ते सोमवार २७ मे २०२४ • POSTAL REG.NO. MCN/157/2023-2025 • RNI. REG. NO. MAHMAR/2010/33301

## संक्षिप्त

### अरविंद केजरीवालांच्या अडचणीत वाढ; १४ दिवसांची कोठडी वाढवण्यासाठी ईडीचा न्यायालयात अर्ज

■ नवी दिल्ली: वृत्तसंस्था

कथित मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यावर ईडीने २१ मार्च रोजी अटकेची कारवाई केली होती. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने केजरीवाल यांना दिलासा देत १ जूनपर्यंत अंतरिम जामीन



मंजूर केला होता. त्यामुळे केजरीवाल तिहार तुरुंगातून बाहेर आले होते. मात्र, २ जून रोजी अरविंद केजरीवाल यांना पुन्हा आत्मसमर्पण करावे लागणार आहे. असे असतानाच आता ईडीने न्यायालयात अर्ज दाखल करत केजरीवाल यांच्या न्यायालयीन कोठडीत १४ दिवसांची वाढ करण्याची मागणी केली आहे. त्यामुळे केजरीवाल यांच्या अडचणी आणखी वाढण्याची शक्यता आहे. कथित मद्य धोरण घोटाळा प्रकरणात आम आदमी पक्षाचे नेते आणि अरविंद केजरीवाल यांच्या अडचणी कमी होताना दिसत नाहीत.

### मनोज जरांगेंचा सरकारला इशारा, 'आमच्या लाखो पोरांवर गुन्हे दाखल करा किंवा आमच्या आया बहिणींवर हल्ले...'

■ जालना: माधव अलवा

मराठा आरक्षणाचा प्रश्न कायम आहे, आम्ही जागरुक आहोत. माझी महाराष्ट्रातल्या बांधवांना विनंती आहे की तुम्ही १०० टक्के मतदान करा, असं मनोज जरांगेंनी म्हटलं आहे. तसंच मनोज जरांगेंनी ४ जूनसंदर्भात मोठा निर्णय घेतला आहे. मनोज जरांगेंनी मराठा बांधवांनाही हे आवाहन केलं आहे मतदान करा. तसंच ज्याला पाडायचं



आहे त्या उमेदवाराला पाडा. आपण कुणालाही पाठिंबा दिलेला नाही असं मनोज जरांगेंनी म्हटलं आहे. 'मराठवाडा, विदर्भातले बांधव मला भेटून गेले. आमची चर्चा झाली. ३ जूनला सगळे येणार आहेत. कारण ४ जूनपासून मी आमरण उपोषण करणार आहे. पाठिंबा, पाठबळ देण्यासाठी हे सगळे येत आहेत. मी लढणार आहे, जोपर्यंत मराठा बांधवांना आरक्षण मिळत नाही तोपर्यंत मी कठोर आमरण उपोषण करणार आहे. ४ जून ही तारीख त्यासाठी नक्की झाली आहे. तीन महिन्यांपूर्वीच ही तारीख नक्की झाली आहे. यामध्ये काहीही झालं तरीही बदल होणार नाही. माझ्या समाजाचा आग्रह आहे की मी उपोषण करु नये. मात्र मी उपोषणावर ठाम आहे. माझ्या समाजाला न्याय मिळाला पाहिजे ही माझी भूमिका आहे.' असं मनोज जरांगेंनी म्हटलं आहे.

# उन्हाच्या झळा, तरीही मतदार मतदानासाठी रांगेत; पोलिसांच्या मोठ्या बंदोबस्तात मतदान

■ मुंबई: विशाल कारंडे

**लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातील मतदानाला मुंबईतील सहा मतदारसंघांत सोमवारी सकाळपासून सुरुवात झाली असून सकाळपासूनच विविध मतदान केंद्रांवर मतदानासाठी मतदारांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. मात्र अनेक ठिकाणी मतदान यंत्रांमध्ये झालेला बिघाड, मोठ्या संख्येने मतदार मतदानासाठी आल्यामुळे लागलेल्या लांबच लांब रांगा, मतदारयादीतील घोळ, तर कुठे खंडित झालेला वीजपुरवठा अशा विविध कारणांमुळे मतदान प्रक्रियेत अडथळे आले.**

**मानखुर्दमध्ये, मुलुंड आणि भांडुप येथे मतदान प्रक्रियेत तांत्रिक अडथळे**

मानखुर्द येथील बूथ क्रमांक ६३ आणि ६५ वरील मतदान यंत्रात बिघाड झाल्याने काही काळ मतदान प्रक्रिया थांबली होती. मतदान यंत्र तातडीने बदलण्यात आल्यानंतर पुन्हा एकदा मतदान प्रक्रिया सुरळीत सुरू झाली. मुलुंड येथील बूथ क्रमांक १२६ वरील मतदान यंत्रातही बिघाड झाला होता,



मात्र तत्काळ दुरुस्ती केल्यानंतर तेथील मतदान प्रक्रिया सुरळीत झाल्याचे निवडणूक यंत्रणेने स्पष्ट केले. भांडुप खिंडीपाडा परिसरातील मतदान केंद्रावरील विद्युतपुरवठा खंडीत झाल्याने मतदान प्रक्रिया ठप्प झाली. अर्ध्या तासाहून अधिक काळ वीजपुरवठा खंडित राहिल्याने मतदान बंद पडले होते.

घाटकोपर पश्चिम येथील भटवाडी, बर्वेनगर, पारशीवाडी, चिरागनगर, माणिकलाल मैदान, जागृती नगर, श्रेयस दामोदर पार्क, अग्निशामक दल पार्कसाईट आणि विक्रोळी पार्कसाईट येथील मतदान केंद्रांवर मतदारांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. दुपारी उन्हाचा तडाखा वाढल्यानंतरही मतदान केंद्रांवर अशीच परिस्थिती होती. आचारसंहिता भंग केल्याप्रकरणी मुंबई पोलिसांनी विविध ठिकाणी गुन्हे दाखल केले आहेत. त्यात दारूच्या बाटल्यांसह एका महिलेला कुरार पोलिसांनी ताब्यात घेतले. याशिवाय साबुसिद्धीकी रुग्णालयाच्या प्रवेशद्वारावर धर्माच्या आधारे मतदान करण्याचे आवाहन केल्याप्रकरणीही सर जे.जे मार्ग पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. प्रचाराचा अवधी संपल्यानंतरही समाज माध्यमांद्वारे



प्रचार केल्याच्या आरोपाखाली डीएन नगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. मालाड पूर्व येथील कुरार आप्पा पाडा परिसरात अंजली पाष्टे (५३) या महिलेला दारूच्या बाटल्यांसह ताब्यात घेण्यात आले. तिच्याकडून व्हिस्कीच्या चार बाटल्या जप्त करण्यात आल्या आहेत.

(शेष पृष्ठ २ वर)

## मुंबईत संथगतीने मतदान सुरु असल्याच्या तक्रारींनंतर उद्धव ठाकरेंचे निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर ताशेरे; म्हणाले, 'भाजपाची चाकरी...'

मुंबईतील काही मतदान केंद्रांवर संथगतीने मतदान सुरू असून हा संपूर्ण प्रकार जाणीवपूर्वक सुरू आहे, असा आरोप ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला आहे. तसेच निवडणूक आयोग केवळ भाजपाची चाकरी करत आहे, अशी टीकाही त्यांनी केली. उद्धव ठाकरे यांनी आज मुंबईत पत्रकार परिषद घेत हे आरोप केले. यावेळी त्यांनी निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धीवर ताशेरे ओढले. आज महाराष्ट्रातील मतदानाचा शेवटचा टप्पा आहे. त्यासाठी शेवटचे काही तास बाकी आहेत. यावेळी मतदारांमध्येही उत्साह आहे. त्यामुळे मतदान केंद्रांवर मतदारांची खूप गर्दी आहे. मात्र, मतदान प्रक्रिया संथगतीने सुरू आहे. पराभवाच्या भीतीने जाणीवपूर्वक हा प्रकार सुरू आहे. निवडणूक आयोग पक्षपातीपणा करत असून ते



केवळ भाजपाच्या इशाऱ्यावर काम करते आहे, असा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला आहे.

निवडणूक आयोगाच्या प्रतिनिधींकडून दिरंगाई केली जात आहे. त्याचा त्रास मतदारांना त्रास होतो आहे. काही मतदान केंद्रावर पिण्याच्या पाण्याचीदेखील सोय नाही. तरीही मतदार रांगा लाऊन उभे आहे. मात्र, जाणीवपूर्वक संथगतीने मतदान सुरू आहे. केवळ पराभवाच्या भितीपोटी हा प्रकार सुरू आहे, असेही ते म्हणाले.ज्या मतदान केंद्रांवर संथगतीने मतदान सुरू आहे. त्याठिकाणी नागरिकांनी निवडणूक अधिकाऱ्यांचे नाव विचारावे. त्याची माहिती शिवसेनेच्या शाखेत द्यावी. उद्या न्यायालयात दाद मागताना ही माहिती कामी येईल. तसेच मी पत्रकारपरिषदेत याची माहिती देईल. कारण नसताना अधिकारी छळ करत असतील तर ते खपवून घेतलं जाणार नाही, अशी प्रतिक्रियाही त्यांनी दिली.

# जुना इतिहास खोडून काढणार, दक्षिणेत PM मोदींना सर्वाधिक अपेक्षा; केलं मोठं वक्तव्य

■ नवी दिल्ली: प्रगती शर्मा

दक्षिण भारतात भाजपला सर्वाधिक जागा मिळतील, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे. त्यांनी पुन्हा एकदा एनडीए ४०० हून जागा जिंगणार असल्याचं वक्तव्य केलं आहे. मोदी म्हणाले आहेत आहे की, आमची रणनीती संपूर्ण देशासाठी सारखीच आहे. पुन्हा एकदा मोदी सरकार आणि ४ जून रोजी तो ४०० पार. रविवारी रात्री पीटीआयला दिलेल्या मुलाखतीत पंतप्रधान मोदी म्हणाले की, दक्षिण भारतातील राज्यांमध्ये भाजपची फारशी ताकद नाही, असं अनेक लोक म्हणतात. मात्र हा इतिहास आम्ही खोडून काढू. ते म्हणाले, तुम्ही फक्त २०१९ च्या निवडणुका बघा, भाजप हा दक्षिण भारतातील सर्वात मोठा पक्ष होता. यावेळीही तसेच होईल. पंतप्रधान मोदी म्हणाले की, आम्ही निवडणुकीत दक्षिण भारतात जास्तीत जास्त जागा जिंकू आणि फरक देखील गेल्या वेळेपेक्षा जास्त असेल. ते म्हणाले की, संपूर्ण प्रदेशात भाजपची मतांची टक्केवारी आणि जागा या दोन्हींमध्ये वाढ झाल्याचे आपण पाहणार आहोत. देशातील लोकसभेच्या एकूण ५४३ जागांपैकी १३१ जागा दक्षिण भारतातील राज्यांमधून येतात. भाजपचे एकूण २९ लोकसभा खासदार येथून आहेत. पंतप्रधान मोदी म्हणाले की, आम्ही पूर्व भारतातही मोठे यश मिळवू. त्यामुळे दिल्लीपासून भुवनेश्वर, कोलकातापर्यंत अनेकांची झोप उडाली आहे.

(शेष पृष्ठ २ वर)



## ISIS च्या चार दहशतवाद्यांना अहमदाबाद विमानतळावरून अटक

### ऐन निवडणूक काळात सुरक्षा यंत्रणांचे धाबे दणाणले

■ अहमदाबाद: वृत्तसंस्था

इस्लामिक स्टेटच्या (इसिस) दहशतवाद्यांविरोधात अहमदाबादला येत असल्याची माहिती गुप्तचर यंत्रणांकडून एटीएसला मिळाली होती. या



भारतीय संरक्षण यंत्रणांना मोठं यश मिळालं आहे. गुजरातच्या दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) अहमदाबाद विमानतळावरून इसिसच्या चार दहशतवाद्यांना ताब्यात घेतलं आहे. एटीएसने अद्याप या चौघांची माहिती जाहीर केलेली नाही. मात्र, या कारवाईबाबत मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार हे चौघेही श्रीलंकेचे नागरिक आहेत. गुजरात एटीएस याप्रकरणाची माहिती देण्यासाठी लवकरच एक पत्रकार परिषद घेणार असल्याचं सांगण्यात आलं आहे. हे चार दहशतवादी माहितीच्या आधारे एटीएस आणि इतर पोलीस कर्मचारी अहमदाबाद विमानतळावरच दबा धरून बसले होते. दहशतवादी विमानतळावर दाखल होताच एटीएसने त्यांना बेड्या ठोकल्या. एटीएसने या दहशतवाद्यांना कुठे नेलंय, दहशतवाद्यांचं अहमदाबादला येण्याचं उद्दीष्ट काय होतं? याबाबतची माहिती अद्याप समोर आलेली नाही. या दहशतवाद्यांकडून मिळालेल्या तिकीटांवरून सूत्रांनी सांगितलं की ते चेन्नईवरून अहमदाबादला आले होते.(शेष पृष्ठ २ वर)

# पुण्यातील पोर्श गाडी अपघात प्रकरणाची देवेंद्र फडणवीसांकडून दखल; कठोर कारवाईचे दिले आदेश

■ पुणे: अभिजीत येरल्लू

**पुणे शहरातील कल्याणी नगर परिसरात रविवारी पहाटे नंबरप्लेट नसलेल्या पोर्श या अलिशान गाडीने मोटरसायकलला धडक दिल्याची घटना घडली होती. या घटनेत दोन दुचाकीस्वारांचा मृत्यू झाला. या भीषण अपघात अपघातातील पोर्शे कार आणि त्या कारचा चालक हा अल्पवयीन (वय १७) वर्षांचा आहे.**

या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. या अपघात प्रकरणात १७ वर्षांच्या अल्पवयीन आरोपीला जामीन मंजुर झाला होता. पुण्यातील एका बड्या बांधकाम व्यावसायीकाचा मुलगा ही अलिशान कार चालवत होता. या अपघाताचा व्हिडीओही आता समोर आला आहे. १७ वर्षीय मुलाला न्यायालयाने काही अटींवर जामीन मंजूर केला. तसेच अपघातावर ३०० शब्दाचा निबंध लिहावा, असे आदेश दिले होते. यानंतर आता या अपघाताची दखल राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली आहे. तसेच या घटनेतील आरोपीवर कठोर कारवाईचे आदेश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. या घटनेसंदर्भातील माहिती देवेंद्र फडणवीस यांनी पुणे पोलिस आयुक्तांना फोन करून घेतली, तसेच तात्काळ कारावाईचे आदेश दिले आहेत.



याबरोबरच या अपघातातील आरोपीला जामीन मिळाला असला तरी त्याविरुद्ध अपील दाखल करण्याच्या सूचना पुणे पोलिस आयुक्तांना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून देण्यात आल्याची माहिती आहे. याबरोबरच या प्रकरणातील आरोपीला कोणती विशेष ट्रिटमेंट दिली असल्यास त्यावेळचे पोलीस ठाण्यातील सीसीटीव्ही फुटेज तपासून ते खरे असेल तर तात्काळ संबंधित अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई करा, अशा सूचना उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या आहेत. सदर मुलगा हा पुण्यातील प्रतिष्ठित बांधकाम व्यावसायिकाचा मुलगा आहे. तो दारुच्या नशेत कार चालवत होता आणि त्याने दोघांना उडवलं ज्यात त्या दोघांचा मृत्यू झाला.(शेष पृष्ठ २ वर)

# राज्यात पावसाचे वातावरण कायम; देशातील काही भागात उष्णतेच्या लाटेचा इशारा

■ मुंबई: रघुवीर जाधव

मॉन्सून अंदमानात दाखल झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या नजरा मॉन्सूनच्या पावसाकडे लागल्या आहेत. मात्र राज्यात मागील १० ते १२ दिवसांपासून वेगवेगळ्या भागात पाऊस पडत आहे. तर देशातील काही भागात उष्णतेची लाट कायम आहे. राज्यात पुढील ५ दिवस काही ठिकाणी वादळी पाऊस तर काही भागात उष्णतेच्या लाटेचा इशारा हवामान विभागाने दिला.

मॉन्सूनने दक्षिण बंगालचा उपसागर, निकोबार बेटे आणि दक्षिण अंदमान समुद्रात प्रगती केली आहे. तर अंदमानात दाखल झालेला मॉन्सून यंदा ३१ मेपर्यंत केरळात दाखल होण्याची शक्यता आहे. पण पूर्व मोसमी पावसाने राज्याला चांगलाच दणका दिला. मागील १० ते १२ दिवसांपासून राज्याच्या वेगवेगळ्या भागात वादळी पाऊस होत आहे. हवामान विभागाने आणखी पुढील ५ दिवस राज्यातील काही भागात पावसाचा अंदाज दिला. हवामान विभागाने आज विदर्भातील अकोला, अमरावती, बुलडणा आणि वाशीम तर मराठवाड्यातील जालना, छत्रपती संभाजीनगर, बीड, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर आणि धाराशिव, तसेच मध्य महाराष्ट्रातील पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, नगर आणि नाशिक जिल्ह्यात तर कोकणातील सिंधूदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यातील काही ठिकाणी विजा आणि मेघगर्जनेसह



वादळी पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला. उद्या म्हणजेच मंगळवारीही विदर्भातील अकोला, अमरावती, बुलडाणा, यवतमाळ आणि वाशीम तर मराठवाड्यातील जालना, बीड, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर आणि धाराशिव, तसेच मध्य महाराष्ट्रातील पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, नगर आणि नाशिक जिल्ह्यात तर कोकणातील सिंधूदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यातील काही ठिकाणी विजा आणि मेघगर्जनेसह वादळी पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला. बुधवारी आणि गुरुवारीही मराठवाडा आणि विदर्भातील काही ठिकाणी वादळी पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला.देशातील काही भागात उष्णतेच्या लाटेचाही इशारा हवामान विभागाने दिला.

# भारत की बेटी सब पर भारी... दीप्तीने जपानमध्ये रचला इतिहास! ४०० मीटर T20 शर्यतीत जिंकले 'गोल्ड मेडल'

■ दिल्ली: प्रगती शर्मा

भारताच्या दीप्ती जीवनजीने जपानमधील कोबे येथे झालेल्या जागतिक पॅरा ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये महिलांच्या ४०० मीटर ऊ२० शर्यतीत ५५.०७ सेकंदांच्या विश्वविक्रमासह सुवर्णपदक जिंकले.


यासोबतच दीप्ती जीवनजी हिला पॅरिस ऑलिम्पिकनंतर होणाऱ्या पॅरालिम्पिक स्पर्धेचा कोटाही मिळाला आहे. पॅरा वर्ल्ड चॅम्पियनशिपच्या ट्रॅक इव्हेंटमध्ये प्रथमच भारतीय खेळाडूने सुवर्णपदक जिंकले आहे. दीप्ती जीवनजीने अमेरिकेच्या ब्रायना क्लार्कचा विश्वविक्रम मोडला. तिने गेल्या वर्षी पॅरिसमध्ये ५५.१२ सेकंदांचा वेळ नोंदवला होता. तुर्कीच्या एसील ओंडरने ५५.१९ सेकंद वेळेसह दुसरे स्थान



पटकावले, तर इक्वेडोरच्या लिजनशेला एंगुलोने ५६.६८ सेकंद वेळेसह तिसरे स्थान पटकावले.

यापूर्वी, पॅरा ॲथलेटिक्स वर्ल्ड चॅम्पियनशिप २०२४ मध्ये, भारताच्या प्रीती पालने महिलांच्या २०० मीटर ऊ३५ प्रकारात कांस्यपदक जिंकले होते. जागतिक पॅरा ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप २०२४ मध्ये भारताने आतापर्यंत एक सुवर्ण, एक रौप्य आणि दोन कांस्यपदके जिंकली आहेत.

जागतिक पॅरा ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपच्या मागील आवृत्तीत, भारताने तीन सुवर्ण, चार रौप्य आणि तीन कांस्यांसह विक्रमी १० पदके जिंकली होती. जागतिक पॅरा ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप २५ मे २०२४ पर्यंत चालणार आहे.




## बेबनावाचे कारण अन् राजकारण

'आप'चे धोरण अनेक नागरिकांना भावते. या पक्षाचा चढता आलेख कौतुकास्पद आहे. आता 'आप'कडे कार्यकर्त्यांची गर्दी झाली आहे. अनेकजण पदे मिळवित गेले. मात्र, त्यातील काहींना 'आम आदमी' म्हणून राहता आले नाही. ते 'खास' झाले आहेत. अशा पक्षाने काँग्रेसशी हातमिळवणी करीत भाजपला आव्हान दिल्याने दिल्लीच्या सात जागांविषयीची उत्सुकता वाढली आहे. आम आदमी पक्षाच्या राज्यसभा खासदार स्वाती मालिवाल यांनी मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी केजरीवालांचे स्वीय सहाय्यक बिभवकुमार यांनी मारहाण केल्याचे आरोप लावले. त्यासाठी बिभवकुमार यांना अटक झाली आहे.

अधिकृतपणे सीसीटीव्हीच्या माध्यमातून प्रकरणाची सत्यता उघडकीस येईल तेव्हा यामागचे खरे कारण आणि त्यामागे दडलेले राजकारणही स्पष्ट होईल. मात्र, ऐन लोकसभा निवडणुकांच्या तोंडावर हा प्रकार 'आप'ला डागाळणारा ठरतो. गेल्या काही महिन्यांत दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवालांची अडवणूक केली जात आहे. पदे मिळवून घेणारे 'आप'चे काही नेते केजरीवालांपासून पाठ फिरवायला लागले आहेत. दुसरीकडे भर प्रचाररॅलीत काँग्रेसचे उमेदवार कन्हैयाकुमार यांना थप्पड मारली जाते. या सगळ्याच कृत्यांमागे भाजप असल्याची टीका होत आहे. हे सत्य असेल तर भाजप इतके हादरले आहे का, हा प्रश्न निर्माण होतो.



अकरा वर्षात अरविंद केजरीवालांच्या आम आदमी पार्टीवर 'राष्ट्रीय पक्षाचा' मुकूट चढला. याचाच अर्थ त्यांच्यामागे कोट्यवधी लोक आहेत. 'आप'चे धोरण मतदारांना भावते. विकासाची कास धरत प्रत्यक्षात अंमलबजावणी करणारा पक्ष असल्याचे मतदारांना दिसते, म्हणूनच या पक्षाचा चढता आलेख कौतुकास्पद आहे. आता 'आप'कडे कार्यकर्त्यांची गर्दी आहे. अनेकजण पदे मिळवित गेलेत. मात्र, त्यातील काहींना 'आम आदमी' म्हणून राहता आले नाही. ते 'खास' झालेत. येत्या २५ मे रोजी दिल्लीतील सातही लोकसभा जागांसाठी मतदान होत आहे. भाजप २०१४ पासून भक्कम पाय रोवून आहे. २०१९ मध्ये भाजपने ५६ टक्के मते घेतली होती. तर काँग्रेसने २२ आणि 'आप'ने १८ टक्के मते घेतली होती. परंतु दोघांची बेरीज ४१ टक्क्यांच्या वर जात नाही.

तिसऱ्यांदा सर्वच जागा जिंकण्यासाठी भाजपने सहा जागांवर नवीन उमेदवार दिले आहेत. विद्यमान खासदारांचे प्रगतिपुस्तक खूप चांगले नाही हे पक्षाला जाणवले. तशातून 'आप'-काँग्रेस 'इंडिया'च्या निमित्ताने एकत्रित आल्याने आपल्याला काही जागा गमवाव्या लागणार असल्याची भीती भाजपला आहे. ईशान्य दिल्लीतून काँग्रेसचे उमेदवार कन्हैय्याकुमार आणि भाजपचे खासदार भोजपुरी अभिनेता मनोज तिवारी आमने-सामने आहेत. कन्हैय्याकुमार प्रचार रॅलीत असताना शुक्रवारी दक्ष चौधरी नावाचा तरुण हातात पुष्पहार घेऊन रॅलीतून वाट काढत कन्हैय्याकुमारपुढे येतो, हार घालतो आणि त्यांच्या गालावर हाणतो. अशा दक्ष चौधरींचा सध्या सुळसुळाट झाला आहे. हाच चौधरी नंतर एक व्हिडीओ जारी करतो. देशाचे तुकडे करण्याची भाषा करणाऱ्याला धडा शिकवला असे सांगत 'जय श्रीराम'च्या घोषणा देत शेखी मिरवतो. या तरुणाला हेही माहिती नाही की, जेएनयू मधील त्या व्हिडिओशी संबंधित असणारे कोण होते? असे असंख्य चौधरी अर्धवट माहिती देऊन समाजात सर्वदूर पेरले गेले आहेत. धार्मिक सौहार्द बिघडविण्याच्या कारणावरून याच चौधरीवर गुन्हे दाखल आहेत. गाझियाबाद पोलिसांनी त्याला अटक केली होती. अलिकडेच तो मनोज तिवारी यांच्या प्रचार सभेत व्यासपीठावर अतिथींच्या रांगेत बसला होता. भाजप म्हणेल आमचा संबंध नाही. कदाचित नसेलही. परंतु राजकारण अत्यंत खालच्या स्तराला गेले याचे हे उदाहरण. गेल्या काही वर्षात चर्चा होते ती नीडर लीडर कोण आहे याची. महाराष्ट्राचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख, शिवसेनेचे संजय राऊत, मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया, खा. संजय सिंग, सत्येंद्र जैन हे तपास यंत्रणांना न घाबरता किंवा भाजपच्या दबावतंत्राला बळी न पडता तुरुंगात गेल्याचा उल्लेख होतो. परंतु तुरुंगाच्या भीतीने भाजपशी मैत्री करणाऱ्या नेत्यांची संख्या अधिक आहे. महाराष्ट्रापासून तर आसामपर्यंतच्या अनेक नेत्यांची नावे सर्वश्रुत आहेत. 'आप'जे राज्यसभा खासदार राघव चढ्डा हे सुद्धा तपास यंत्रणांच्या सावटात आहेत. मुख्यमंत्री केजरीवालांचे ते खास आहेत. त्यांना केजरीवालांचा हनुमान संबोधले जाते. केजरीवाल हे सत्यनिष्ठा असलेले आधुनिक काळातील महात्मा गांधी असल्याचे राघव सांगतात. त्यांनी संसदेत असो वा पक्षाच्या व्यासपीठावरून भाजपवर प्रहार केलेत. परंतु जेव्हा त्यांना 'अब तो जेल मे जाना पडेगा....'ची अनुभूती झाली तेव्हापासून त्यांची दातखीळ बसली आहे. 'डोळ्यांच्या उपचाराच्या निमित्ताने ते मार्चच्या पहिल्या आठवड्यात लंडनला रवाना झाले. हा हनुमान केजरीवाल किंवा पक्षावर आलेल्या संकटावर गप्प आहे. राघव शनिवारी भारतात आले.

# पालघर जिल्ह्यातल्या केळवे-माहिमचा इतिहास!

मुंबईला लागूनच असणाऱ्या आत्ताच्या पालघर व पूर्वीच्या ठाणे जिल्ह्यात केळवे व माहीम हि ऐतिहासिक गावे वसलेली आहेत. या दोन्ही गावांना खूप मोठा इतिहास आहे. तर आज आपण या लेखातून उत्तर कोकणातल्या या केळवे व माहीमचा संपूर्ण परिसराचा इतिहास नेमका काय आहे व आज तेथे पाहण्यासारख्या कोणत्या गोष्टी आहेत हे जाणून घेऊ. चला तर मग आजच्या केळवे - माहीम च्या सफारीला सुरुवात करूया.



भारताच्या पश्चिम किनार पट्टीला प्राचीन काळापासून अनन्यसाधारण महत्त्व लाभले आहे. हे महत्त्व लाभण्यामागे व्यापार व त्यासाठी असणाऱ्या बंदरांना पूरक अशी भौगोलिक, सामाजिक, राजकीय स्थिती इ. गोष्टी कारणीभूत आहेत. याच भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर भडोच, सोपारा, चौल, कल्याण, श्रीस्थानक म्हणजेच आजचे ठाणे इत्यादी महत्त्वाच्या नैसर्गिक बंदरांना व्यापारासाठी अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले होते. कारण याच बंदरांमधून अतिशय मोकळ्या व सुरक्षित वातावरणात भारताचा जगाशी व्यापार होत असे. या बंदरांना संरक्षण देण्यासाठी पश्चिम किनारपट्टीवर म्हणजेच गुजरातमधील खंबातच्या आखातापासून ते केरळ-कन्याकुमारीपर्यंत समुद्रात व समुद्रतीरावर दुर्गांची एक शृंखला राज्यकर्त्यांकडून निर्माण केली गेली. यामागील मुख्य उद्देश असा कि, हा संपूर्ण व्यापार ज्या समुद्रमार्गे होत असे तेथील सर्व लहान-मोठ्या बंदरांना व प्रजेला या दुर्गांच्या माध्यमातून सुरक्षा पुरविणे असा होता.

या ठिकाणचा इतिहास हा मोठा रंजित आहे. इ.स.११४० साली प्रतापबिंब राजाने उत्तर कोकणावर स्वारी केली. प्रथम त्याने दमण प्रांत काबीज केला व पुढे त्याने केळवे - माहीम प्रांतावर स्वारी केली. सुरुवातीस त्याने तारापूर जिंकून घेतले व त्याने माहीम पूर्वीचे महिकावती यावर स्वारी केली. त्याकाळी या प्रांतात 'बिनाजी घोडेले' नामक राजा राज्य करीत होता. प्रतापबिंबाच्या प्रचंड सैन्यापुढे त्याचा टिकाव लागला नाही. त्यामुळे प्रतापबिंबाने लगोलग हा प्रदेश जिंकून घेतला.



बिनाजी घोडेल राज्य करीत असता सर्व देश वैरण व उध्वस्त झाला होता. त्यापूर्वी हा प्रदेश उत्तर कोकणातील शिलाहारांच्या अंमलाखाली होता. परंतु शिलाहार सत्ता डळमळीत झाल्यावर हा प्रदेश वन्य लोकांच्या बदअमलाखाली गेला.प्रतापबिंबाने दमणपासून थेट वाळकेश्वर बाणगंगा मुंबई एवढा प्रदेश काबीज केला व उत्तर कोकणातील शिलाहारांना येथून हुसकावून लावले. या संपूर्ण प्रदेशाचा केळवे - माहीम हा मध्यबिंदू पकडून प्रतापबिंबाने तेथे त्याची राजधानी स्थापन केली. संपूर्ण राज्याच्या झालेल्या दुरावस्थेचा परामर्श घेऊन प्रतापबिंबाने नवीन वसाहत स्थापिली. बिंबांचे हे राज्य पुढे सुमारे १०० वर्षे टिकले. हे राज्य महिकावतीचे राज्य म्हणून ज्ञात आहे.

पुढे १३ व्या शतकाच्या उत्तरार्धात हा प्रदेश गुजरातच्या सुलतानांच्या ताब्यात गेला. त्यानंतर इ.स.१५३२ च्या सुमारास हा प्रदेश पोर्तुगीजांच्या अधीन झाला. इ.स. १७३९ साली वसईच्या मोहिमेवर असतांना मराठ्यांनी हा प्रदेश जिंकून घेतला व येथे मराठी अंमल सुरु झाला. इ.स.१८१८ साली इंग्रजी अंमल सुरु होईपर्यंत हा प्रदेश मराठ्यांकडे होता.

आजही आपण केळवे-माहीम या ऐतिहासिक ठिकाणाला भेट देऊ शकतो. परंतु आज ही दोन्ही गावे बऱ्यापैकी लहान गावे आहेत. केळवे गावात तुम्हाला एकूण दोन दुर्ग पाहता येतात. यातील एक दुर्ग हा केळव्याच्या समुद्रकिनाऱ्यावर आहे व दुसरा दुर्ग हा समुद्रात असून त्याची एक खासियत आहे. ती खासियत अशी कि समुद्राच्या ओहोटीच्या वेळी आपल्याला या दुर्गापर्यंत चालत जाता येते. हा दुर्ग एका जहाजाच्या आकाराचा आहे. याचबरोबर केळवे गावात प्रसिद्ध असे शितळादेवीचे मंदिर आहे. यानंतर जेव्हा तुम्ही माहीम गावात याल तेव्हा माहीममधील प्रायमरी हेल्थ सेन्टरच्या मागे माहीमचा दुर्ग वसलेला दिसेल. या दुर्गाचं आत्ताचं रुप हे पोर्तुगीज काळातील आहे.

# भारतात १३ जागतिक वारसा स्थळं

जागतिक वारसा स्थानांच्या यादीत भारतातल्या वेगवेगळ्या स्थळांचा समावेश होतो. जसे की महाराष्ट्रातल्याच अजिंठा-वेरूळ गुहा असतील, कर्नाटकचं हम्पी हे गाव असेल किंवा ताजमहाल सारखी ऐतिहासिक वास्तू असेल. सांस्कृतिक आणि भौगोलिकदृष्ट्या महत्वाच्या




स्थानांना युनेस्कोने आपल्या यादीत स्थान दिलं आहे. एकदा का एखादं स्थळ जागतिक वारसा यादीत सामील झालं, की त्याच्या देखभालीची आर्थिक जबाबदारी युनेस्को घेतं. भारत हे जगातल्या तब्बल ३६ जागतिक वारसा स्थळांचं घर आहे. या आधारावर भारताचा जगात ६वा क्रमांक लागतो.

वाचकहो, आज आम्ही घेऊन आलो आहोत या ३६ मधून १३ निवडक स्थळांची यादी. ही यादी बघून तुम्हालाही तेथे जाण्याचा मोह आवरणार नाही. चला तर पाहूया !

**१. पश्चिम घाट (सह्याद्री) – गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा, केरळ, तामिळनाडू:** भारताच्या पश्चिमेकडील गुजरात पासून ते दक्षिणेत तामिळनाडू पर्यंत पसरलेल्या पश्चिम घाट अर्थात आपल्या सह्याद्री डोंगररांगेला युनेस्कोने जागतिक वारसा म्हणून घोषित केलं आहे. सह्याद्रीचा भाग त्याच्या जैवविविधतेसाठी ओळखला जातो. जगातील सर्वात जास्त जैवविविधता असणाऱ्या आठ जागांपैकी सह्याद्री एक आहे. याच सह्याद्रीत महाराष्ट्रातील अनेक महत्वाच्या ठिकाणांचा समावेश होतो. उदाहरणार्थ, महाराष्ट्रातील सर्वात उंच कळसुबाईचं शिखर, हरिश्चंद्रगड, महाबळेश्वर आणि महाराष्ट्राची शान असलेले अनेक गडकिल्ले.

**२. कोणार्क सूर्यमंदिर – ओडीसा:** कोणार्कचं सूर्यमंदिर म्हणजे बारा चाके आणि सात घोडे असलेला एक सूर्यरथ आहे. हा भारतीय स्थापत्यकलेचा एक उत्कृष्ट नमुना



म्हणून ओळखला जातो. भारतात अशा प्रकारची मंदिर रचना दुसऱ्या कोणत्याही मंदिरात दिसत नाही.

**३. राजस्थानचे डोंगरी किल्ले दुर्ग:** चित्तोडगढ किल्ला, कुंभलगढ किल्ला, रंथंबोर किल्ला, आमेर दुर्ग, गागरौन दुर्ग आणि जैसलमेर दुर्ग, अशा राजस्थानच्या सगळ्याच गिरिदुर्गांचा समावेश युनेस्कोने जागतिक वारसा यादीत करून घेतला आहे. हे डोंगरी किल्ले राजपूत शासनाच्या कालखंडाची साक्ष देत आजही सुस्थितीत उभे आहेत. या किल्ल्याचं सगळ्यात मोठं वैशिष्ट्य म्हणजे त्यांची स्थापत्यकला. त्यांचा कालावधी अगदी ५ व्या शतकापासून ते १८ व्या शतकापर्यंत पसरला आहे.

**४. राणी की बाव – गुजरात:** 'राणी की बाव' ही एक प्रचंड विहीर आहे, पण त्याची रचना अत्यंत कलात्मकतेने केली गेली आहे. या विहिरीचं बांधकाम १०६३ साली चालुक्य राज्यकाळात करण्यात आलं. ही विहीर म्हणजे चालुक्य राजा भीम पहिला याच्या आठवणीत त्याच्या राणीने बांधलेलं स्मारक आहे. नुकतंच शंभरच्या नोटेवर 'राणी की बाव' ला स्थान देण्यात आलंय.

**५. भीमबेटका – मध्यप्रदेश:** भारतातील आदिम संस्कृतीचे अवशेष असलेलं भीमबेटका हे एक प्रमुख ठिकाण. इतिहासतज्ञांच्या मते जवळजवळ १ लाख वर्षापूर्वी आदिम मानवाचं हे वसतीस्थान होतं. भारतातील सर्वात प्राचीन भित्तीचित्रे भीमबेटका येथील गुहेत सापडतात. या भित्तीचित्रांचा काळ हा आजपासून ३०.००० वर्षापूर्वीचा आहे.

**६. खजुराहो - मध्यप्रदेश:** खजुराहो या ठिकाणी हिंदू आणि जैन मंदिरांचा समूह आढळतो. खजुराहो हे विशेषतः कामशिल्पाकरिता ओळखलं जातं, पण याखेरीज तत्कालीन समाजजीवनातील दैनंदिन गोष्टी शिल्पांमध्ये आपल्याला पाहायला मिळतात. युद्ध, शिकार, नृत्य, देवदेवता, शैक्षणिक पद्धती, इत्यादी गोष्टींना शिल्परूप देण्यात आलं आहे.

**७. महाबलीपुरम - तामिळनाडू:** महाबलीपुरम हे तामिळनाडूचं ७व्या शतकातील एक महत्वाचं बंदर होतं. या शहराला आज मंदिरांचं शहर म्हणून ओळखलं जातं. भव्य मंदिर आणि द्राविडी स्थापत्यकेलसाठी हा भाग महत्वाचा मानला जातो.

**८. अजिंठा-वेरूळ गुहा - महाराष्ट्र:** अजिंठा येथे २९ तर वेरूळ येथे ३४ लेण्यांचा समूह आढळतो.



वेरूळ येथील लेण्याचं वैशिष्ट्य हे स्थापत्यकला असून तेथे बौद्ध, हिंदू आणि जैन शिल्प आढळतात. अजिंठा येथील लेण्या ह्या प्रामुख्याने भित्तिचित्रांसाठी ओळखल्या जातात. जातक कथेतील अनेक प्रसंगांना अजिंठ्याच्या लेण्यात चितारण्यात आलं आहे.


**९. हम्पी - कर्नाटक:** हम्पी हे विजयनगर साम्राज्याच्या राजधानीचे ठिकाण. युनेस्कोने संपूर्ण हम्पी गावालाच जागतिक वारसा यादीत स्थान दिलं आहे. हम्पी येथील मंदिरं आणि शिल्पे पाहण्यासारखी आहेत. येथील विरुपाक्ष मंदिर विशेष प्रसिद्ध आहे.

**१०. ताजमहाल – उत्तरप्रदेश:** आग्र्याचं ताजमहाल हे मुळात एक स्मारक आहे. याचा जगातील ७ आश्चर्यात समावेश होतो. ताजमहालची संगमरवरातील रचना हे त्याचं सर्वात मोठं वैशिष्ट्य. मुघल स्थापत्यशैलीचं ताजमहाल हे एक उत्तम उदाहरण आहे.

**११. गोव्याचे चर्चेस:** गोव्याचे चर्चेस आणि धर्मस्थळांना जागतिक वारसा यादीत स्थान मिळालं आहे. याचं कारण म्हणजे तिथली वास्तुकला. प्रत्येक चर्च हे पोर्तुगीज वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना आहे.

**१२. भारताची पहाडी रेल्वे लाईन - ईशान्य भारत:** भारतातील प्रमुख अशा ३ पर्वतीय रेल्वे मार्गांना जागतिक वारसा यादीत स्थान मिळालं आहे. दार्जीलिंग रेल्वे, निलगिरी रेल्वे, काल्का-शिमला रेल्वे हे ते तीन रेल्वेमाग. त्या रेल्वेमार्गांना १९ व्या व २० व्या शतकात बांधण्यात आलं. हे रेल्वे मार्ग ज्या भागातून जातात तिथलं निसर्गसौंदर्य हे पाहण्याजोगं आहे.

**१३. ग्रेट हिमालयन राष्ट्रीय उद्यान - हिमाचल प्रदेश:** हिमाचल प्रदेशच्या कुल्लू भागातील ७५४.४ स्क्वेअर किलोमीटर जागेत ग्रेट हिमालयन राष्ट्रीय उद्यान वसलेलं आहे. हे राष्ट्रीय उद्यान तिथल्या



जैवविविधतेसाठी ओळखलं जातं. या भागात तब्बल ३७५ जातीचे वन्यजीव आढळतात. यासोबतच जगात कुठेही आढळणार नाही अशा वनस्पतींनी हे उद्यान भरलेलं आहे. हिमालयाच्या अगदी कुशीत असलेलं हे ठिकाण मनाला भुरळ घालणारं आहे.

पान १ वरुन...

### उन्हाच्या झळा, तरीही...

याप्रकरणी महिलेला सीआरपीसी कलम ४१(१) (अ) अंतर्गत नोटीस देण्यात आली आहे. भरारी पथकाने केलेल्या कारवाईत महिला दारूच्या बाटल्यांसह सापडली होती. डोंगरी इमामवाडा येथे साबुसिद्धीकी या रुग्णालयाच्या प्रवेशद्वारावर धर्माच्या आधारे मदतान करण्याचे आवाहन करणारे पोस्टर सापडले. याप्रकरणी सर जे.जे. पोलिसांनी अब्दुल रज्जाक मणियार याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. याशिवाय प्रचार कालावधी संपला असताना प्रचार करत असताना व्हॉट्सअॅप ग्रुपवर प्रचार करत असताना आढळला. याप्रकरणी डीएन नगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. मोहसिन हैदर नावाच्या व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस याप्रकरणी अधिक तपास करत आहेत.

### जुना इतिहास खोडून काढणार...

ते म्हणाले की, आम्हाला जनतेचा आशीर्वाद मिळत असून यावरी आम्ही सगळेविक्रम मोडू. आम्ही देशभरात पूर्वीपेक्षा जास्त जागा जिंकू. हे विशेषतः पूर्व आणि दक्षिण भारतात होईल. एनडीए निश्चितपणे ४०० पार करेल.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, आतापर्यंत ज्या टप्प्यांमध्ये मतदान झाले आहे. त्यांच्या विश्लेषणातून असे दिसून येते की, आघाडी करूनही काँग्रेस अनेक राज्यांत आपले खातेही उघडू शकलेली नाही. ते म्हणाले की, भाजप हा पहिल्या दिवसापासूनच राष्ट्रीय पक्ष आहे. आम्ही फक्त आमच्या भौगोलिक स्थितीमुळेच नाही तर आम्ही वैचारिक आधारामुळेही राष्ट्रीय पक्ष आहोत.

### पुण्यातील पोर्श गाडी...

त्याच्या रक्ताचे नमुने तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. तसंच त्याला जामीनही मिळाला होता. पुणे शहर पोलिसांनी सांगितलं की, या प्रकरणातला आरोपी अल्पवयीन आहे. त्याच्याविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला. त्याच्याविरोधात मोटार वाहन कायद्यातील ज्या कलमांचं उल्लंघन झालं ती कलमंही लावण्यात आली. या प्रकरणात अल्पवयीन मुलाचे वडील आणि ज्या बारने या मुलाला आणि त्याच्या मित्रांना मद्य दिलं त्यांच्याविरोधात कलम ७५ आणि ७७ अंतर्गत कारवाई केली जाईल. असंही त्यांनी स्पष्ट केलं होतं.

### चार दहशतवाद्यांना...

चारही दहशतवादी आधी कोलंबोवरून चेन्नई आणि मग चेन्नईवरून अहमदाबादला आले होते. त्यांचे हँडलर भारतात त्यांना मार्गदर्शन करत होते. त्यामुळे एटीएस आता या हँडलर्सचा शोध घेत आहे. हे दहशतवादी चेन्नईमध्ये, अहमदाबादमध्ये ज्या-ज्या लोकांना भेटले होते त्यांच्यापासून आणि त्यांना भारतात मार्ग दाखवणाऱ्या हँडलर्सपासून देशाला मोठा धोका आहे. त्यामुळे गुजरात एटीएससह देशातील इतर संरक्षण यंत्रणा आणि गुप्तचर यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. हे दहशतवादी अहमदाबादमध्ये त्यांच्या हँडलरच्या संदेशाची वाट पाहत होते. त्याआधीच एटीएसने त्यांच्या मुसक्या आवळल्या. या दहशतवाद्यांना पकडलं असलं तरी ऐन निवडणुकीत चार दहशतवादी भारतात घुसले होते, या बातमीने संरक्षण आणि गुप्तचर यंत्रणांचे धाबे दणाणले आहेत.

इस्लामिक स्टेट ऑफ इराक अँड लेव्हंट (इएइए) ही दहशतवादी संघटना गेल्या काही वर्षापासून भारतात हातपाय पसरण्याचा प्रयत्न करत आहे. मात्र, भारतीय गुप्तचर यंत्रणा आणि संरक्षण यंत्रणांनी त्यांना अद्याप यशस्वी होऊ दिलेलं नाही. यावर्षी मार्च महिन्यात संरक्षण यंत्रणांनी आसाममध्ये इसिसच्या एका कमांडरला बेड्या ठोकल्या होत्या. त्याच्याबरोबर आसाममधील त्याच्या हँडलरलाही ताब्यात घेतलं होतं. इसिसचा हा कमांडर बांगलादेश-भारत सीमा ओलांडून भारतात घुसला होता.

Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press Unit No. 4 , Ground Floor, N.K. Industrial Estate, Off. Aarey Road, Near Parvasi Ind Estate , Gate No.2, Goregaon(E), Mumbai- 400063 Maharashtra and published at 105-A-Wing, 1st Floor, Maa-Ashapura Chs Ltd. Near Gurunanak Hospital, BKC Link Road, Bandra (East), Mumbai-400051 Maharashtra. **Editor- Rakesh Shankar Gore.**
• Mail id : maharashtracrimetimes@gmail.com , Contact No- 9892386748 / 9803386748, Website : www.maharashtracrimetimes.com

# दुर्घटनेमुळे 'रेल्वे पोलीस पेट्रोल पंप' बंद होण्याच्या मार्गावर?

**मुंबई: राकेश गायकवाड**

घाटकोपर येथील महाकाय लोखंडी जाहिरात फलक कोसळून झालेल्या दुर्घटनेत १६ जणांचा मृत्यू झाला. याबाबत रेल्वे पोलीस विभागाने संपूर्ण घटनाक्रमाचा आणि याआधीच्या घटनांचा अहवाल गृह विभाग व पोलीस महासंचालकांना बुधवारी सादर केला. रेल्वे पोलीस वसाहतीच्या जागेवरील पेट्रोल पंप अनधिकृत असल्याचे समोर येत आहे. या पेट्रोल पंपासाठी लागणाऱ्या परवानगीची कागदपत्रे, 'ना हरकत प्रमाणपत्र' नाहीत. तशी नोंद कुर्ला तहसीलदार, भूमी अभिलेख विभागाकडे नाही. त्यामुळे घाटकोपर दुर्घटनेमुळे रेल्वे पोलीस पेट्रोल पंप बंद होण्याच्या मार्गावर असल्याची दाट शक्यता आहे. घाटकोपर येथील रेल्वे पोलीस वसाहतीच्या आरक्षित भुखंडावर गृह खात्याची किंवा महसूल खात्याची परवानगी न घेता अनधिकृत पेट्रोल पंप उभारण्यात आला. गृह खात्याला ही जागा नको असेल तर, ती महसूल खात्याला परत करावी लागणार आहे. तसेच या जागेवर भारत पेट्रोलियमचा पेट्रोल पंप उभा असून या पेट्रोल पंपाच्या परवानगीची कागदपत्रे राज्य शासन, जिल्हाधिकारी यांच्याकडून 'ना हरकत' प्रमाणपत्रे देण्यात आल्याची नोंद नाही, असे तहसीलदार कुर्ला (मुलुंड) कार्यालयाने डिसेंबर २०२१ रोजी स्पष्ट केले होते. भूमि अभिलेख विभागातील नगर भूमापन अधिकारी, घाटकोपर यांनीही सप्टेंबर २०२२ रोजी अशा प्रकारचे स्पष्टीकरण अर्जदार संदीप कुलते यांना दिले होते.



मात्र, अधिकाऱ्यांनी अधिकाराचा गैरवापर आणि दबावतंत्राचा वापर करून पेट्रोल पंप सुरूच ठेवला. मात्र, सोमवारी घडलेल्या दुर्घटनेनंतर आता संपूर्ण प्रकारणाची चौकशी करण्यात येणार आहे.

पेट्रोल पंपावरील मनुष्यबळ व व्यवस्थापनाची जबाबदारी लॉर्ड मार्क इंडस्ट्रीज प्रा. लि. यांच्याकडे सोपविण्यात आली होती. मात्र, तत्कालीन लोहमार्ग पोलीस आयुक्त कैसर खालिद यांनी रेल्वे पोलीस पेट्रोल पंपावर सकाळ आणि सायंकाळी प्रत्येकी तीन रेल्वे पोलीस बंदोबस्तासाठी ठेवले होते. मात्र याबाबत कोणताही लेखी आदेश नसल्याने सध्याचे लोहमार्ग पोलीस आयुक्त रवींद्र शिसवे यांनी हा पोलीस बंदोबस्त काढून घेतला. त्यामुळे एकूण सहा रेल्वे पोलिसांचा उपयोग अन्य महत्त्वाच्या कामासाठी केला जात आहे. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या पूर्वपरवानगीने जानेवारी २०२० मध्ये पेट्रोल पंपाला मंजुरी मिळाली होती. हा पेट्रोल पंप पोलीस आयुक्त आणि मुंबई रेल्वे कल्याण निधी संस्था चालवत होती, असे माहिती अधिकारातून समोर आले आहे.

# उच्च न्यायालयाचा महानगरपालिकेला तडाखा; कार्यक्रम रद्द झाल्यानंतरही परवानगीसाठी जमा केलेली रक्कम परत न करणे भोवले

**मुंबई: प्रथमेश चव्हाण**

**'मुंबई शांती महोत्सव २०२२'च्या आयोजनासाठी पोलिसांचे ना हरकत प्रमाणपत्र मिळवण्यात अपयशी ठरलेल्या अहमदनगर येथील एका धार्मिक ट्रस्टच्या सदस्याला नऊ लाख रुपयांची रक्कम परत करण्यास नकार देणाऱ्या मुंबई पालिकेच्या भूमिकेबाबत उच्च न्यायालयाने गुरुवारी आश्चर्य व्यक्त केले. त्याचप्रमाणे, ही रक्कम याचिकाकर्त्याला परत करण्याचे आदेश दिले.**

हा कार्यक्रम अहमदनगरस्थित 'होली स्पिरिट जनरेशन चर्च'तर्फे वांद्रे कुर्ला संकुलातील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मैदानावर आयोजित करण्यात येणार होता. त्यास देशभरातील सात हजारांहून अधिक सदस्य उपस्थित राहणार होते. आयोजकांनी कार्यक्रमासाठी आवश्यक परवानग्या मागितल्या आणि त्यासाठीची रक्कमही जमा केली. त्यानुसार, 'एमएमआरडीए'कडे १८ लाख २३ हजार ९१३ रुपये, तात्पुरते अकृषी शुल्क म्हणून उपविभागीय अधिकाऱ्याकडे दोन लाख ५७ हजार ४०६ जमा केले. याशिवाय, अग्निसुरक्षा पडताळणी शुल्क म्हणून आठ लाख तीन हजार १३० रुपये व मुख्य अग्निशमन अधिकारी आणि उप अग्निशमन अधिकारी यांच्याकडील अग्निशमन इंजिन आणि कर्मचाऱ्यांसाठीचे भाडे शुल्क म्हणून अतिरिक्त ५७ हजार ८५० रूपये पालिकेकडे जमा करण्यात आले. तथापि, कायदा, सुव्यवस्थेचे कारण देऊन कार्यक्रम आयोजित करण्यासाठी बीकेसी पोलीस ठाण्याने ना हरकत प्रमाणपत्र देण्यास नकार दिला. त्यामुळे, आयोजकांनी विविध प्राधिकरणांकडे जमा केलेल्या सुमारे २९.५ लाख रुपयांचा परतावा मागितला.



एमएमआरडीएने रक्कम परत केली, पण एसडीओ आणि अग्निशमन अधिकाऱ्यांनी पैसे परत केले नाहीत. त्यामुळे, ही रक्कम परत करण्याच्या मागणीचे आदेश देण्यासाठी चर्चशी संबंधित असलेले प्रदीप कोल्हे यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. याचिकेवरील सुनावणी प्रलंबित असताना, एसडीओने रक्कम परत केली. दुसरीकडे, महापालिकेने जमा केलेली रक्कम याचिकाकर्त्या ट्रस्टला परत करण्यास नकार दिला. कार्यक्रम रद्द झाल्यास रक्कम परत करण्याचे कोणतेही धोरण नाही, असे सांगून पालिकेने भूमिकेचे समर्थन केले. परंतु, ही रक्कम परत करणे किंवा जप्त करण्याची तरतूद नसणे हे धक्कादायक असल्याची टिप्पणी न्यायमूर्ती मकरंद कर्णिक आणि न्यायमूर्ती कमल खाता यांच्या खंडपीठाने केली. परतावा मागण्याचा याचिकाकर्त्यांना हक्क आहे. मात्र, ही रक्कम जप्त करून आपल्याकडे ठेवणे अन्यायकारक असल्याचे ताशेरेही न्यायालयाने याचिकाकर्त्यांना दिलासा देताना नमूद केले.

# ठाणेकर अद्वैत नादावडेकरच्या कुंचल्यातून साकारली पंतप्रधानांची भेट, तैलचित्र ठरले लक्षवेधी

**मुंबई: विशाल कारंडे**

लोकसभा निवडणुकीनिमित्त प्रचारार्थ दादरमधील छत्रपती शिवाजी महाराज पार्क मैदानावर महायुतीची शुक्रवारी जाहीर सभा पार पडली. या सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेट देण्यात आलेल्या तैलचित्राने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले. विशेष बाब म्हणजे देव्हाऱ्यातील भारतमातेच्या मूर्तीला वंदन करताना स्वातंत्र्यवीर सावरकरांचे तैलचित्र ठाण्यातील २३ वर्षीय अद्वैत नादावडेकर या तरुणाने साकारले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी लोकसभा निवडणुकीच्या प्रचारार्थ मुंबईत येणार होते. त्यामुळे महाराष्ट्राचा इतिहास, संस्कृती, विचार, वारसा आदी गोष्टींचे दर्शन घडविणारी एक भेट पंतप्रधानांना द्यावी, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सुचले. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी अशा स्वरूपातील तैलचित्राबाबत अद्वैत नादावडेकर याच्याकडे विचारणा केली. त्यानंतर स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी लिहिलेल्या 'जयोस्तु ते श्रीमहन्मंगले शिवास्पदे शुभदे स्वतंत्रते भगवती त्वामहं यशोयुतां वंदे' या गीताला स्मरून अद्वैतला तैलचित्राची संकल्पना सुचली आणि ही संकल्पना मुख्यमंत्र्यांच्याही पसंतीस पडली. अवघ्या चार दिवसांत साकारलेले हे तैलचित्र तीन बाय चार फूट आकाराचे आहे. देव आणि देशाची सांगड घातलेल्या देव्हाऱ्यातील भारतमातेच्या मूर्तीला स्वातंत्र्यवीर सावरकर वंदन करताना तैलचित्रात दाखविले आहे. हे तैलचित्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दादरमधील सभेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार, मनसे अध्यक्ष राज ठाकरे आदी महायुतीचे नेते व्यासपीठावर उपस्थित होते.



'मला खूप अभिमान वाटतो आहे की एका तरुण चित्रकाराची दखल घेतली जाते. माझ्या कुंचल्यातून साकारलेले तैलचित्र महाराष्ट्र राज्याची भेट म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना देण्यात आले, याचा मला आनंद आहे.

# मोफा कायदा रद्द करण्यासाठी पुन्हा हालचाली!

**मुंबई: नितीन देवळेकर**

स्थावर संपदा कायद्याच्या (रेरा) स्थापनेनंतर महाराष्ट्र ओनरशिप ऑफ फ्लॅट कायदा (मोफा) रद्द झाल्याच्या राज्याच्या न्याय व विधि विभागाच्या अभिप्रायामुळे गृहनिर्माण विभागाची पंचाईत झाली होती. मात्र गृहनिर्माण विभागाने ठाम भूमिका घेतल्यामुळे मोफा कायदा अस्तित्वात राहिला होता. आता पुन्हा एकदा मोफा कायदा असावा की नसावा, अशी चर्चा सुरू झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. या दिशेने न्याय व विधि विभाग तसेच गृहनिर्माण विभागाच्या गुरुवारी झालेल्या संयुक्त बैठकीत या विषयावर चर्चा झाली. मात्र तूर्तास मोफा कायद्याला अभय मिळाल्याचे या बैठकीला उपस्थित असलेल्या सूत्रांनी सांगितले.

मोफा कायदा रद्द झाल्याने आपल्याविरुद्ध नोंदवलेला गुन्हा मागे घेण्यात यावा, अशी याचिका उच्च न्यायालयात करण्यात आली होती. २०१४ मध्ये महाराष्ट्र गृहनिर्माण (नियमन आणि विकास) कायदा लागू झाल्यामुळे मोफा कायदा रद्द झाल्याचा युक्तिवाद करण्यात आला होता. याबाबत उच्च न्यायालयाने गृहनिर्माण विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांना प्रतिज्ञापत्र सादर करावयास सांगितले होते. त्यामुळे गृहनिर्माण विभागाने न्याय व विधि विभागाकडे अभिप्राय मागितला होता. महाराष्ट्र गृहनिर्माण कायद्यातील कलम ५६ (१) नुसार मोफा कायदा रद्द करण्याबाबत कार्यवाही करण्यात आलेली नव्हती, असा अभिप्राय न्याय व विधि विभागाच्या सचिवांनी सुरुवातीला दिला. नंतर याच अभिप्रायात म्हटले होते की, एकाच विषयाबाबत केंद्र व राज्याने कायदे केल्यास व सदर विषयाबाबत दोन्ही कायद्यांमधील तरतुदींमध्ये विसंगती आढळल्यास राज्य घटनेच्या कलम २५४ अन्वये केंद्राचा कायदा गृहित धरला जातो. त्यानुसार रेरा कायदा अस्तित्वात आल्यामुळे मोफा कायदा रद्द झाल्याचे म्हटले होते. त्यामुळे गृहनिर्माण विभागापुढे पेच निर्माण झाला होता. अखेर गृहनिर्माण विभागाने राज्याच्या महाधिवक्त्यांचा अभिप्राय मागविला. महाधिवक्त्यांनी मोफा कायदा अस्तित्वात आहे किंवा रद्द झाला आहे, याबाबत स्पष्ट अभिप्राय दिला नाही. मात्र उच्च न्यायालयात दाखल असलेल्या प्रकरणाचा उल्लेख करीत मोफा कायदा अस्तित्वात नसल्याचे गृहित धरले तरी सदर प्रकरणाचे महत्त्व कमी होत नाही, असा संदिग्ध अभिप्राय दिला होता. आता याच मुद्द्यावर राज्याच्या महाधिवक्त्यांनी संयुक्त बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीत मोफा कायदा हा प्रमुख विषय होता. त्यामुळे मोफा कायदा रद्द करण्याच्या दिशेने चर्चा होईल, असे वाटत असतानाच या बैठकीत फक्त मोफा कायद्याबाबत चर्चा झाल्याचे सूत्रांनी सांगितले.



# निवडणुकीनंतर सामाजिक सलोखा बिघडण्याची चिंता; मराठा आरक्षणाचा मुद्दा

**मुंबई: सम्यक कासारे**

मराठवाड्यातील काही मतदारसंघांत काहीसा परिणाम झाला. निवडणुकीच्या राजकारणातून जाती-जमातींमध्ये भांडणे होत आहेत. आरक्षणाच्या मुद्द्यावरून जातीय संघर्ष उभा राहात आहे, ही महाराष्ट्राच्या दृष्टीने धोक्याची घंटा आहे. दोन समाज एकमेकांसमोर उभे ठाकत आहेत. सामाजिक सलोखा बिघडविण्यात येत आहे. निवडणुकीत कोणी कोणाला मतदान केले, हे चित्र निकालानंतर स्पष्ट होईल. त्यामुळे या निवडणुकीनंतर सामाजिक सलोखा बिघडण्याची आणि कायदा व सुव्यवस्थेला धोका निर्माण होण्याची चिंता किंवा भीती मला वाटत आहे. सामाजिक सलोखा टिकविण्यासाठी जागरूक राहण्याची गरज आहे.

शिवसेना फुटल्यामुळे उद्धव ठाकरे यांच्याकडचे नेते, कार्यकर्ते, मते व ताकद कमी झाली. ती भरून काढण्यासाठी ठाकरे यांनी कॉंग्रेसपेक्षा अधिक मुस्लिमांचे तुष्टीकरण करण्याचे धोरण स्वीकारले आहे. त्यांच्या सभा, मेळाव्यांमध्ये मुस्लिमांचा चांद-तारा असलेले हिरवे झेंडे असतात, हे समजण्यासारखे आहे. पण पाकिस्तानचे राष्ट्रध्वजही त्यांच्या मेळाव्यांमध्ये दिसून येत आहेत. टिपू सुलतान झिंदाबादचे




नारे तेथे देण्यात आले. उद्धव ठाकरे हे राष्ट्रीय नेते असल्याचे त्यांच्या पक्षाचे काही जण सांगत आहेत. मात्र ते दिल्लीतील नव्हे, तर गल्लीतील नेते आहेत, हे त्यांच्या भाषेवरून दिसून येते. ते आपल्या भाषण आणि वक्तव्यांमध्ये अतिशय खालच्या दर्जाची भाषा वापरत आहेत. शिवसेनेशी गेली २५-३० वर्षांहून अधिक काळ युती असल्याने ती भावनिक असून राष्ट्रवादी कॉंग्रेसशी राजकीय युती आहे. कोणत्याही निवडणुकीसाठी राजकारणाची 'रासायनिक समीकरण (केमिस्ट्री) ' आणि 'मतांचे गणित ' दोन्हीही जमावे लागते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा पक्ष भाजपबरोबर सत्तेत आल्यानंतरही उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी कॉंग्रेसही बरोबर येण्याची त्यासाठी गरज होती. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष शरद पवार हे 'इंडिया' आघाडीचे सूत्रधार असून त्यांची महाराष्ट्रातील आमदार-खासदारांची संख्या तुलनेने कमी असली तरी देशपातळीवर विरोधकांची मोट बांधण्यात ते अग्रेसर होते. भाजपला देशपातळीवर एकटे पाडले जात असेल, तर काही सहकारी वाढविणे ही राजकीय गरज होती. महाराष्ट्रात युतीचे राजकारण यशस्वी होते, हे आम्हाला गेल्या काही निवडणुकांनंतर प्रकर्षाने जाणवलेले आहे. त्यामुळे निवडणुकीचे गणित जमविण्यासाठी अजित पवार यांना बरोबर घेण्यात आले. शिंदे-पवार यांना बरोबर घेतले, तरी काही नेते व मते ही उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्यासमवेत आहेत, हे मान्यच करावे लागेल. पण शिंदे-अजित पवार यांच्यामुळे निवडणुका लढविणे सोपे जाईल, या हेतूने शिंदे यांच्याबरोबरचे राज्यात स्थिर सरकार असूनही अजित पवार यांनाही बरोबर घेण्यात आले. अजित पवार यांना बरोबर घेतल्यावर विशेषत: पश्चिम महाराष्ट्रातील भाजप नेते व कार्यकर्त्यांमध्ये नाराजी होती. त्यांनी अनेक वर्षे राष्ट्रवादी कॉंग्रेसविरोधाचे राजकारण केले आहे. कोणतीही नवीन युती कार्यकर्त्यांमध्ये मुरण्यासाठी काही काळ द्यावा लागतो. त्यामुळे पुढील काही निवडणुका एकत्रित लढविल्यावर आणि १०-२० वर्षांमध्ये अजित पवारांबरोबरच्या युतीमध्येही भावनिक नाते निर्माण होईल.

# मुंबईला ३ वर्षे पुरेल एवढ्या पाण्याची वाफ!

**मुंबई: माधव अलवा**

राज्यातील मोठ्या, मध्यम आणि लघुसिंचन प्रकल्पातून दरवर्षी १६५ टीएमसी पाण्याचे बाष्पीभवन होत असल्याची आकडेवारी समोर आली आहे. सरकारच्या जलसंपदा विभागाने तयार केलेल्या 'पाणी लेखापरीक्षण अहवाला'नुसार पुण्याला नऊ वर्षे, तर मुंबईला तीन वर्षे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होऊ शकेल, एवढ्या पाण्याची वाफ होत असल्याचे स्पष्ट झाले आहे. या पाण्याद्वारे ८.२५ लाख हेक्टरवरील शेतीचे सिंचन होऊ शकले असते. राजस्थान आणि महाराष्ट्रातील बाष्पीभवनाचा दर सर्वाधिक आहे. राज्याच्या पाणी लेखापरीक्षण अहवाल २०२१-२२ नुसार मोठे, लहान व मध्यम प्रकल्पांची एकूण पाणीसाठवण क्षमता सुमारे १,४९६ अब्ज घनफूट (टीएमसी) असून त्यापैकी सुमारे ११ टक्के (१६५ टीएमसी) पाण्याचे एका वर्षात बाष्पीभवन होते. विदर्भात २.५ ते ३ मीटर, मराठवाड्यात २ ते २.७५ मीटर, उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्रात १.५ ते १.७५ मीटर तर कोकणात ०.८० मीटर पाण्याचे दरवर्षी बाष्पीभवन होते. केवळ तापमान वाढीमुळे बाष्पीभवनाचा वेग वाढतो, हा समजही चुकीचा आहे. तापमानाबरोबरच क्षेत्रफळ (पाणी पसारा), वातावरणातील बाष्पाचे प्रमाण, वाऱ्याचा वेग आणि पाण्याची खोली यांचाही परिणाम होतो. त्यातही ८० टक्के बाष्पीभवनासाठी वायुप्रवाह जबाबदार असतो. उन्हाळ्यात बाष्पीभवनाचा दर जास्त असतो. कोकणात बाष्पाचे प्रमाण जास्त असल्याने बाष्पीभवनाचा वेग कमी असतो. धरणनिहाय आणि हंगामनिहाय बाष्पीभवनाचा वेग भिन्न असल्याचे जलसंपदा विभागाचे पुण्यातील मुख्य अभियंता डॉ. हेमंत धुमाळ यांनी स्पष्ट केले. एका वर्षात श्रीशैलम प्रकल्पातील ३३ टीएमसी, नागार्जुन सागरमधील १६ टीएमसी आणि उजनी धरणातील २२ टीएमी पाण्याचे बाष्पीभवन होते. वाढत्या तापमानामुळे बाष्पीभवनाचा वेगही वाढत आहे.



# कोणत्याही नवीन जाहिरात फलकांना तूर्तास परवानगी नाही, पालिका आयुक्तांचे स्पष्ट आदेश

**मुंबई: संजीनी खाडे**

नागरी सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देवून त्याचबरोबर शहराला बकालपणा येणार नाही, अशा रितीनेच यापुढे जाहिरात फलकांना परवानगी दिली जाणार आहे. त्यादृष्टीने जाहिरात फलक धोरणात तरतूदींचा समावेश करण्यात येईल. त्यामुळे तुर्तास नवीन जाहिरात फलकांना परवानगी दिली जाणार नाही, अशी ठाम भूमिका पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी घेतली आहे.

घाटकोपरमधील जाहिरात फलक कोसळून झालेल्या दुर्घटनेसारखी पुनरावृत्ती होवू नये यासाठी महानगरपालिका आयुक्त यांच्या दालनात विविध यंत्रणांच्या प्रतिनिधींशी गुरुवारी सायंकाळी बैठक झाली. त्यावेळी अध्यक्षस्थानावरुन बोलताना आयुक्तांनी ही भूमिका स्पष्ट केली. रेल्वे प्रशासनाला त्यांच्या हद्दीतील नियमबाह्य आकाराचे जाहिरात फलक हटविण्याचे निर्देश महानगरपालिका प्रशासनाने दिले आहेत. फक्त रेल्वेच नव्हे तर, मुंबईतील कोणत्याही शासकीय अथवा खासगी जागेत जाहिरात फलक लावण्यासाठी महानगरपालिकेची तसेच वाहतूक पोलिसांनी निश्चित केलेल्या मानकांचे अवलंबन करणे बंधनकारक असून त्याचे पालन सर्व संबंधितांना करावेच लागेल, याचा पुनरुच्चार महानगरपालिका आयुक्तांनी या बैठकीत केला. या बैठकीला अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी, सह पोलिस आयुक्त (वाहतूक) अनिल कुंभारे, महानगरपालिकेचे उप आयुक्त (विशेष) किरण दिघावकर, पश्चिम रेल्वेचे व्यावसायिक व्यवस्थापक विनीत अभिषेक, मध्य रेल्वेचे प्रतिनिधी तसेच आयआयटी मुंबईचे तज्ञ प्रा. अभिजीत माजी, प्रा. नागेंद्र राव वेलगा, प्रा. श्रीकुमार, महानगरपालिकेचे अनुज्ञापन अधीक्षक अनिल काटे आदींची उपस्थिती होती. घाटकोपरमधील जाहिरात फलक दुर्घटनेच्या अनुषंगाने, संपूर्ण मुंबईतील विविध शासकीय यंत्रणांच्या हद्दीत असलेल्या जाहिरात फलकांविषयी याप्रसंगी चर्चा करण्यात आली. रेल्वे तसेच इतर प्राधिकरणांच्या अधिकाऱ्यांनी देखील त्यांचे प्रशासकीय मुद्दे उपस्थित केले. त्यानंतर महानगरपालिका आयुक्त गगराणी म्हणाले, घाटकोपरमधील दुर्घटनास्थळ हे मध्य अथवा पश्चिम रेल्वे यांच्या अखत्यारीत नसले तरी या दोन्ही रेल्वे प्रशासनाच्या हद्दीत मोठ्या आकाराचे जाहिरात फलक आहेत. जाहिरात फलकांच्या बाबतीत महानगरपालिकेने ठरवून दिलेली सर्व मानके पाळणे बंधनकारक असल्याचे न्यायालयाच्या आदेशात देखील नमूद आहे. त्यासोबतच वाहतूक पोलिसांचीदेखील परवानगी घेणे आवश्यक आहे. संबंधित शासकीय प्राधिकरणांनी त्यांची प्रमाणित कार्यपद्धती तयार करून कार्यवाही केली तरी, महानगरपालिकेने निश्चित केलेली मानके पाळणे बंधनकारकच आहे. तसेच आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण या नात्याने वेळप्रसंगी जाहिरात फलकांच्या बाबतीत देखील आपत्ती व्यवस्थापन अधिनियम लागू करण्यास महानगरपालिका हयगय करणार नाही, असेही आयुक्तांनी यावेळी निक्षून सांगितले. सह पोलिस आयुक्त (वाहतूक) कुंभारे म्हणाले की, पारंपरिक जाहिरात फलकांसोबत डिजिटल जाहिरात फलकांचादेखील नागरी सुरक्षिततेच्या दृष्टीने विचार करणे आवश्यक आहे. कारण पारंपरिक जाहिरात फलक डिजिटल फलकांमध्ये रुपांतरित करण्याचा वेग वाढतो आहे. असे डिजिटल फलक प्रसंगी वाहनधारकांचे आणि नागरिकांचे विशेषत: सायंकाळी व रात्रीच्या वेळेस लक्ष विचलित होण्यास कारणीभूत ठरतात, अशा आशयाच्या तक्रारी प्राप्त होतात. त्यामुळे जाहिरात धोरणामध्ये देखील या अनुषंगाने विचार व्हावा, अशी अपेक्षा कुंभारे यांनी व्यक्त केली. सर्वसमावेशक धोरण अस्तित्वात येईपर्यंत वाहतूक पोलिसदेखील नवीन जाहिरात फलकांना परवानगी देणार नाहीत, असेही ते म्हणाले.



# मिरा-भाईंदरमधील रहिवाशांना अतिरिक्त पाण्यासाठी प्रतीक्षा, सूर्य प्रादेशिक पाणीपुरवठा प्रकल्पाचा दुसरा टप्पा रखडला

**■ वसई: दिगंबर जाधव**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) सूर्या प्रादेशिक पाणीपुरवठा प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यातील काम मे २०२४ पर्यंत पूर्ण होईल. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मिरा-भाईंदर शहराला प्रतिदिन २१८ दशलक्ष लिटर पाणी पुरवठा होईल, असे एमएमआरडीएकडून सांगण्यात आले होते. मात्र काही कारणांमुळे या प्रकल्पाला विलंब झाला असून आतापर्यंत दुसऱ्या टप्प्याचे ९० टक्के काम पूर्ण झाले आहे. उर्वरित काम जूनअखेरीस पूर्ण होण्याची शक्यता आहे. तसेच १३२ केव्ही ट्रान्समिशन लाईनचे काम पूर्ण होण्यास आणखी काही महिने लागणार आहेत. त्यामुळे मुबलक पाण्यासाठी मिरा-भाईंदरकरांना आणखी काही महिने प्रतीक्षा करावी लागणार आहे. वसई-विरार आणि मिरा-भाईंदरमधील पाणी टंचाईचा प्रश्न मार्गी लावून या शहरांना मुबलक पाणीपुरवठा करण्यासाठी सुमारे १३२५.७८ कोटी रुपये खर्चाचा सूर्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजना प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पाअंतर्गत ४०३ दशलक्ष लिटर क्षमतेने पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. या प्रकल्पाच्या कामाला २०१७ मध्ये सुरुवात झाली. काम सुरू झाल्यापासून ३४ महिन्यांत प्रकल्प पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र अनेक तांत्रिक अडचणी, भूसंपादन आणि इतर समस्यांमुळे हे काम संथ गतीने सुरू राहिले आणि प्रकल्पाला विलंब झाला. मात्र एमएमआरडीएने २०२१ नंतर कामाला गती दिली. त्यामुळेच जून २०२३ मध्ये या प्रकल्पातील पहिला टप्पा पूर्ण झाला आणि नोव्हेंबर २०२३ पासून वसई-विरारला पाणीपुरवठा सुरू झाला. दरम्यान, या प्रकल्पाचा दुसरा टप्पा मे २०२४ मध्ये पूर्ण होईल असे एमएमआरडीएकडून सांगण्यात आले होते. मात्र हा मुहूर्त आता चुकला आहे. सूर्या प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याच्या कामाबाबत एमएमआरडीएकडे विचारणा केली असता आतापर्यंत ९० टक्के काम पूर्ण झाल्याची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. उर्वरित काम जूनअखेरपर्यंत पूर्ण होईल, असेही त्यांनी सांगितले. त्याचवेळी राष्ट्रीय महामार्ग ४८ चे काँक्रिटीकरण सुरू आहे.



## रेल्वेगाडीत लैंगिक अत्याचार झाल्याचा मॉडेलचा आरोप, ठाणे रेल्वे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**■ ठाणे: तृप्ती गोरे**

तुलसी या एक्स्प्रेस गाडीमध्ये गुंगीकारक पदार्थ देऊन काही जणांनी एका मॉडेलवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी ठाणे लोहमार्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तरुणीने ३९ दिवसानंतर याप्रकरणी



ग्वाल्हेर येथील पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तेथून २१ दिवसांनी हे प्रकरण ठाणे लोहमार्ग पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आले. ठाणे लोहमार्ग पोलिसांची विविध पथके याप्रकरणाचा तपास करीत असले तरी या घटनेसंबंधीचे ठोस पुरावे पोलिसांना अद्याप मिळू शकलेले नाहीत. यामुळे पोलिसांनी आता विविध दिशेने तपासाची चक्रे वळविली आहेत. पीडित तरुणीने दिलेल्या तक्रारीनुसार, ती ग्वाल्हेरमध्ये राहते. ती मॉडेलिंग करण्यासाठी मुंबईत येत असते. १० मार्चला ती तुलसी एक्स्प्रेस या रेल्वेगाडीने प्रवास करत होती. रेल्वेगाडी ठाणे लोहमार्ग पोलीस ठाण्याच्या हद्दीत आली असता, काही जणांनी तिला गुंगीकारक औषध दिले. त्यानंतर तिच्यावर काहीजणांनी लैंगिक अत्याचार केला. हा प्रकार झाल्यानंतर पीडित तरुणीने ३९ दिवसांनी ग्वाल्हेर येथील पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तेथून हे प्रकरण २१ दिवसांनी ठाणे लोहमार्ग पोलीस ठाण्यात तपासासाठी आले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन ठाणे लोहमार्ग पोलिसांनी विविध पथके तयार केली. ज्या दिवशी तरुणीने प्रवास केला. त्यादिवशीच्या तिकीटांचा तपशील पोलिसांनी प्राप्त केला. परंतु पीडीत महिलेच्या नावाचे कोणतेही तपशील पोलिसांना आढळलेला नाही.

तुलसी एक्स्प्रेससह गोरखपूर, कुशीनगर या रेल्वेगाड्यांच्या तिकीटांचा देखील तपशील काढला. त्यामध्येही पीडीत महिलेचे नाव नव्हते. पोलिसांनी एलटीटी रेल्वे स्थानकातील सीसीटीव्ही चित्रीकरण प्राप्त करण्याचा प्रयत्न केला. परंतु घटनेला दोन महिन्यांहून अधिकचा कालावधी झाल्याने सीसीटीव्ही चित्रीकरण मिळू शकलेले नाही.

## 'लीन झालेत, आता विलीनही होतील', एकनाथ शिंदेंचा उद्धव ठाकरेंना टोला: काँग्रेसचा उल्लेख करत म्हणाले...

**■ ठाणे: तृप्ती गोरे**

**लोकसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्रातील शेवटच्या टप्प्याचं मतदान सोमवारी २० मे रोजी असून त्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर टीकास्र सोडलं आहे. उद्धव ठाकरेंना मुख्यमंत्री होण्याची सुप्र इच्छा होतीच, त्यांना मुख्यमंत्री व्हायचं नव्हतं हे साफ खोटं आहे, असं एकनाथ शिंदे या मुलाखतीमध्ये म्हणाले आहेत. याशिवाय त्यांनी महाराष्ट्रातील विविध राजकीय मुद्द्यांवर सविस्तर भाष्य केलं आहे.**

उद्धव ठाकरेंच्या भाषणांमधून भगवा ध्वज गायब झाल्याचा आरोप एकनाथ शिंदे यांनी यावेळी केला. 'शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्यासाठी भगवा ध्वज जीव की प्राण होता. पण आज उध्दव ठाकरे यांच्या भाषणातून, प्रचारातून, मिरवणुकांमधून भगवा ध्वज गायब झाला आहे. विशिष्ट समाजाची मते मिळविण्यासाठी त्यांना हिंदुत्व नकोसे झाले आहे. अल्पसंख्यांकाच्या तुष्टीकरणासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघासारख्या राष्ट्रविचाराने प्रेरीत असलेल्या संघटनेवर टीका करण्यापर्यंत त्यांची मजल गेली', अशा शब्दांत एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरे यांच्यावर हल्लाबोल केला. 'पाकिस्तानचा झेंडा प्रचार मिरवणुकांमध्ये नाचवायचा आणि भगव्याच्या नावाने बोटे मोडायची.



देशद्रोह्यांना निवडणूक प्रचारात फिरवायचे आणि देशभक्त संघटनांना शिव्याशाप द्यायचे. पाकिस्तानची भाषा बोलणाऱ्या काँग्रेसच्या गळ्यात गळे घालायचे. ठराविक व्होट बँकेची मतं मिळवण्यासाठी आणखी किती लांगूलचालन करणार?,' असा थेट सवाल एकनाथ शिंदे यांनी उपस्थित केला आहे. दरम्यान, शरद पवारांनी केलेल्या एका विधानावर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केलेल्या वक्तव्याचा संदर्भ देत एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंवर टीकास्र सोडलं. पंतप्रधानांनी उद्धव ठाकरे व अजित पवारांना सरकारमध्ये येण्याचं आवाहन केल्याबाबत प्रश्न विचारला असता त्यावर मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिलं. 'शरद पवार यांनी काही दिवसांपूर्वी सर्व प्रादेशिक पक्ष या निवडणुकीनंतर काँग्रेसमध्ये विलीन होतील असे वक्तव्य केले होते. नरेंद्र मोदी यांच्या विधानाला ही पार्श्वभूमी होती. शरद पवार काहीही म्हणोत उद्धव ठाकरे यांनी त्यांचा पक्ष आधीच काँग्रेसपुढे लीन केला आहे. उद्धव काँग्रेससमोर लीन झाले आहेतच; लवकर विलीनही होतील', असं मुख्यमंत्री म्हणाले. मविआ सरकारच्या काळात राष्ट्रवादी काँग्रेसच्या एकाधिकारशाहीवर आक्षेप असताना आता सरकारमध्ये अजित पवार कसे? असा प्रश्न केला असता 'महाविकास आघाडीत परिस्थिती वेगळी होती. तेव्हा मी मुख्यमंत्री नव्हतो, आता सरकारच्या दोऱ्या माझ्या हातात आहेत. हा फरक समजून घ्यायला हवा', असंही मुख्यमंत्री म्हणाले.

## पनवेल महापालिकेच्या पहिल्या क्रिकेट प्रशिक्षण केंद्राचे काम ८० टक्के पूर्ण

**■ नवी मुंबई: धनश्री सट्टा**

पनवेल महापालिकेच्या स्थापनेनंतर पहिल्यांदाच पालिका नवीन पनवेल येथे क्रिकेट प्रशिक्षण केंद्र उभारत असून या क्रिकेट प्रशिक्षण केंद्राचे ८० टक्के बांधकाम पूर्ण झाले असून जून अखेरीस हे बांधकाम पूर्ण होणार आहे. नुकतेच पालिका आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ यांनी प्रशिक्षण केंद्राची पाहणी करुन कामाचा आढावा घेतला. पनवेल महापालिकेच्या सदस्यांनी सभागृहात ठराव करुन सिडको महामंडळाकडून क्रिकेट प्रशिक्षणासाठी नवीन पनवेल येथील आदई सर्कलशेजारचा २८ हजार चौरस मीटरचा भव्य भूखंड मिळविला. या भव्य भूखंडावर क्रीडांगणाचे आरक्षण असल्याने पालिकेने येथे क्रिकेट प्रशिक्षणासाठी भव्य मैदान बांधले आहे. तब्बल १२ कोटी रुपये पालिका या प्रशिक्षण केंद्राच्या बांधकामासाठी खर्च करत आहे. पुढील नऊ वर्षे देशाचे ज्येष्ठ क्रिकेटपटू दिलीप वेंगसरकर यांच्या प्रशिक्षण संस्थेला हे प्रशिक्षण केंद्र पालिका देखभाल व प्रशिक्षणासाठी देण्याचे पालिका सदस्यांनी ठरविले आहे. वेंगसरकर यांची प्रशिक्षण



संस्था वर्षात शंभर प्रशिणार्थींना या मैदानात क्रिकेटचे धडे देणार आहे. शंभर प्रशिक्षणार्थी निवडताना पनवेल पालिका क्षेत्रातील ५० तसेच रायगड जिल्ह्यातील २५ व राज्यातील २५ या निकषावर प्रशिक्षणार्थ्यांची निवड केली जाणार आहे. जुलै महिन्यात दिलीप वेंगसरकर प्रशिक्षण संस्थेकडे हे मैदान हस्तांतरण झाल्यानंतर यंदाच्या दिवाळीपासून या मैदानातून क्रिकेटच्या प्रशिक्षणाला सुरुवात होईल अशी अपेक्षा आहे. वेंगसरकर यांची संस्था या मैदानाच्या देखभालीचा खर्च विविध कंपन्यांच्या कोर्पोरेट सोशीअल रिस्पॉन्सिब्लिटी (सीएसआर) निधीतून करणार आहे. तसेच या मैदानामध्ये विविध क्रिकेट सामन्यांच्या मालिका आयोजित करुन त्यामधून मिळणाऱ्या नफ्यातून या प्रशिक्षण केंद्राची देखभाल वेंगसरकर यांच्या संस्थेला करावी लागणार आहे.

## कल्याणमध्ये अंधेरीतील तरूणीवर ज्वलनशील पदार्थ टाकून लुटले

**■ कल्याण: आकाश कांबळे**

कल्याण पूर्व रेल्वे स्थानक परिसरात शनिवारी रात्री दोन जणांनी एक तरूणीच्या अंगावर ज्वलनशील पदार्थ टाकून तिच्या जवळील लॅपटॉपची बॅग हिसकावून पलायन केले आहे. ही तरूणी गंभीर जखमी झाली असून तिच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. कोळसेवाडी पोलीस या प्रकरणातील दोन आरोपींचा शोध घेत आहेत. ही तरूणी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी करत आहे. ती मुंबईतील अंधेरी भागात राहते. कल्याण पूर्वेत राहत असलेल्या मित्राला त्याचा लॅपटॉप देण्यासाठी शनिवारी ही तरुणी कल्याण पूर्व भागात आली होती. कल्याण पूर्व वाहनतळ परिसरातून जात असताना अचानक या तरूणीच्या पाठीमागून आलेल्या दोन भुरट्या चोरांनी या तरूणीजवळ पैसे किंवा त्याच्याजवळ किमती



ऐवज असेल या विचारातून तिच्या अंगावर ज्वलनशील पदार्थ टाकला. अचानक घडलेल्या या प्रकाराने तरूणीला काही क्षण कळलेच नाही. अंगावर ज्वलनशील पदार्थ पडल्याने या तरूणीच्या सर्वांगासह डोळ्याची आग होऊ लागली. तिला काही क्षण काय करायचे आणि काय झाले ते कळलेच नाही. डोळ्याची आग सुरू झाल्याने ती काही क्षण डोळे बंद केले. तोपर्यंत तिच्या जवळील किमती ऐवज चोरून नेण्याच्या प्रयत्नात असलेल्या दोन जणांनी तरूणी जवळील लॅपटॉपची पिशवी हिसकावून पळ काढला. पादचाऱ्यांनी या तरूणीला मदत करून तिला कोळसेवाडी पोलीस ठाण्यात नेले. तेथे पोलिसांनी तात्काळ या तरूणीला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. पोलिसांनी घटना घडल्या ठिकाणीला भेट देऊन परिसरातील सीसीटीव्ही चित्रण तपासून आरोपींचा शोध सुरू केला आहे.

## वळीवामुळे भाज्या कडाडल्या, दरात २० रुपयांनी वाढ; नाशिक, पुणे जिल्ह्यांत उत्पादनात घट

**■ पालघर: सचिन कदम**

गेले काही दिवस राज्यात ठिकठिकाणी होत असलेल्या वळीवाच्या पावसाचा परिणाम भाज्यांवर होऊ लागला आहे. भाज्यांच्या मोठे नुकसान झाल्यामुळे बाजारात आवक




घटली आहे. परिणामी, घाऊक आणि किरकोळ बाजारात भाज्यांच्या दरात वाढ झाली. भेंडी, दुधी भोपळा, चवळी शेंग, फरसबी, कारले, वांगी आणि शिमला मिरचीचे दर किरकोळ बाजारात गेल्या आठवड्याच्या तुलनेत दहा ते वीस रुपयांनी वाढले आहेत. यंदा वळीव पावसाचा भाजी उत्पादनाला फटका बसला. वाशी कृषी उत्पन्न बाजार समितीत पुणे आणि नाशिक जिल्ह्यात पिकवलेल्या भाज्यांची मोठी आवक होते. राज्यातील विविध भागांत झालेल्या वळीव पावसामुळे भाज्यांचे मोठे नुकसान झाले. त्यामुळे आवक घटली आहे. वाशी कृषी उत्पन्न बाजार समितीत आठड्याभरापूर्वी दिवसाला १२० ते १५० गाड्या दाखल होत होत्या. गुरुवारपासून त्यात घट झाली. सध्या दिवसाला ९० ते ११० भाजीच्या गाड्या दाखल होत असल्याचे वाशी कृषी उत्पन्न बाजार समितीतील सूत्रांनी सांगितले. परिणामी, मुंबई तसेच उपनगरातील बाजारपेठेत भाज्यांची आवक घटली असून त्यांच्या दरात वाढ झाली.

## मतदानाच्या आदल्यादिवशीच 'प्रिसायडिंग ऑफिसर'चा मृत्यू; ठाण्यात होमगार्डला ह्रदयविकाराचा झटका

**■ वसई: दिगंबर जाधव**

सहा वर्षाच्या मुलाला खासगी व्हिडिओ शूट करण्यास सांगितल्याप्रकरणी उरण पोलिसांनी २५ वर्षीय महिला आणि तिच्या ३५ वर्षीय प्रियकरावर गुन्हा दाखल केला आहे. पनवेल सत्र न्यायालयाने पोलिसांना तसे निर्देश दिल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला. फ्री प्रेस जर्नलने यासंदर्भातील वृत्त दिलं.

एका पोलिस अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, महिलेने तिच्या प्रियकरावर बलात्काराचा गुन्हा दाखल केला होता. खटल्यादरम्यान पुरावा म्हणून व्हिडिओ न्यायालयात सादर करण्यात आला. हा व्हिडिओ तिसऱ्या व्यक्तीने शूट केल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले. याबाबत महिलेला विचारले असता हा व्हिडिओ तिच्या मुलाने शूट केला



असल्याचं तिने सांगितलं. चौकशी केली असता, मुलाने सांगितले की, त्याने त्याच्या 'काकांच्या' (सहआरोपी) सांगण्यावरून असे केले होते.'

'एका अल्पवयीन मुलाने दोन अश्लील व्हिडीओ काढल्याचे कळताच न्यायालयाने बलात्कार प्रकरणातील आरोपीच्या जामीन अर्जावर सुनावणी करताना पोलिसांना एफआयआर नोंदविण्याचे निर्देश दिले, त्यानंतर उरण पोलिसांनी मंगळवारी गुन्हा दाखल केला', अशी माहितीही पोलिसांनी दिली. महिलेच्या पतीने तिला आणि तिच्या मुलाला जवळपास सहा महिन्यांपूर्वी सोडून दिले होते. या प्रकरणी अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नाही, असे पोलिसांनी सांगितले. आरोपींवर भारतीय दंड संहितेच्या कलम ३४ आणि लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण कायद्याच्या संबंधित कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पोलीस निवडणूक बंदोबस्तावर असल्याने कल्याण, डोंबिवलीत घरफोड्या वाढल्या

**■ डोंबिवली: सतिश सोनावणे**

कल्याण, डोंबिवली हद्दीतील पोलीस लोकसभा निवडणूक कामावर व्यस्त असल्याने रात्रीच्या वेळेत घरफोड्यांचे प्रमाण वाढले आहे. या आठवड्यात सलग चार दिवस कल्याण पूर्व, डोंबिवलीत घरफोड्या करून चोरट्यांनी लाखो रूपयांचा ऐवज लांबविला आहे.

दोन दिवसापूर्वी कल्याण पूर्वेतील कोळसेवाडी, काटेमानिवली भागात घरफोड्या झाल्याच्या तक्रारी आहेत. या घटना ताज्या असतानाच डोंबिवलीत विष्णुनगरमध्ये आणि कल्याणमध्ये कोळसेवाडी पोलीस ठाणे हद्दीत चोरीच्या घटना घडल्या आहेत.

डोंबिवली पश्चिमेतील कोपर हद्दीत तुळशी पवार या महिला राहतात. त्या कोपर छेद रस्त्यावरील नील कमल बंगल्या शेजारील अजित पवार चाळ भागात राहतात. मंगळवारी, बुधवारी त्या काही कामानिमित्त आपल्या नातेवाईकांकडे गेल्या होत्या. या संधीचा फायदा घेऊन पाळत ठेऊन असलेल्या चोरट्यांनी त्यांच्या बंद



घराचा कडीकोयंडा, कुलूप तोडून घरात प्रवेश केला. घरातील लोखंडी कपाटातील तिजोरीत असलेले दोन लाख ४५ हजार रूपयांचे सोन्याचे दागिने, काही रोख रक्कम असा ऐवज लुटून पलायन केले.

असाच प्रकार कल्याण पूर्वेतील कोळसेवाडी पोलीस ठाणे हद्दीतील खडेगोळवली भागातील कृष्णा उपाध्याय चाळीत घडला आहे. या चाळीत राहणाऱ्या तक्रारदार पौर्णिमा जाधव या रविवारी आपल्या नातेवाईकांच्या शेजारील घरी वाढदिवस कार्यक्रमासाठी कुटुंबासह गेल्या होत्या. यावेळी पाळत ठेऊन असलेल्या भुरट्या चोराने जाधव यांच्या घरात कोणीही नाही या संधीचा गैरफायदा घेत त्यांच्या घरात प्रवेश केला. त्यांच्या घरातील लोखंडी कपाटातील तिजोरीत ठेवलेले सोन्याचे दागिने, रोख रक्कम असा एकूण एक लाख ८१ हजार रूपयांचा ऐवज चोरून नेला.

पौर्णिमा जाधव कार्यक्रम उरकून घरी आल्या तेव्हा त्यांना घराचा दरवाजा उघडा असल्याचे दिसले. त्यांना संशय आला. त्यांनी कपाटातील तिजोरी पाहिली तर त्यात ठेवलेला ऐवज नसल्याचे दिसले. चोरट्याने चोरी केल्याने त्यांनी कोळसेवाडी पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे.

## कल्याणमधील गोविंद करसन चौकातील बस थांब्यामुळे वाहन कोंडी

**■ कल्याण: आकाश कांबळे**

कल्याण पश्चिमेतील सर्वाधिक वर्दळीच्या रस्त्यावरील गोविंद करसन चौकात प्रवासी वाहतुकीच्या कल्याण डोंबिवली पालिकेच्या परिवहन विभागाच्या बस उभ्या करून ठेवण्यात येतात. या बस मुख्य रस्त्यावर उभ्या करण्यात येत असल्याने या भागात दररोज वाहन कोंडी होते. या बस प्रवासी वाहतुकीसाठी गोविंद करसन चौकात वळविल्या जातात. या मोठ्या बस वळविताना अनेक वेळा वाहन कोंडी होते. या बसचा थांबा बाजारपेठ विभागातील आतील रस्त्यांवर, बाजार समिती भागातील रस्त्यांवर करण्यात यावा, अशी प्रवाशांची मागणी आहे. पत्रीपूल ते शिवाजी चौक दरम्यानचा रस्ता आता काँक्रीटचा आणि प्रशस्त करण्यात आला आहे. त्यामुळे या रस्त्यावर अलीकडे वाहन कोंडी होत नाही. परंतु, गोविंद करसन चौकात केडीएमटीच्या प्रवासी वाहतुकीच्या बस या भागात असतात. या बससाठी उभे असलेले प्रवासी चौकात मुख्य रस्त्यावर उभे असतात. एका पाठोपाठ बस रांगेत उभ्या करण्यात येत असल्याने रस्त्याचा मुख्य भाग व्यापला जातो. त्यामुळे पत्रीपुलाकडून शिवाजी चौकाकडे जाणाऱ्या वाहनांना एका मार्गिकेतून जावे



लागते. या रस्त्यावरून अवजड वाहन जात असेल तर ते या बसच्या कोंडीत अडकते. अनेक वेळा वाहने करसन चौकात वळण घेऊन वलीपीर रस्त्याने रेल्वे स्थानकाकडे जाण्याचा प्रयत्न करतात ही वाहने या बसमुळे अडकतात. आणि शिवाजी चौकातील वाहने या वाहनांचामागे अडकून पडतात. करसन चौकात केडीएमटीच्या बसमुळे दररोजची कोंडी होत असल्याने या चौकातील बस इतर भागातून प्रवाशांच्या सोयीप्रमाणे सोडण्यात याव्यात, अशा मागणी वाहन चालकांकडून केली जात आहे. या चौकाच्या परिसरात राहणारे व्यापारी, रहिवासी या सततच्या कोंडीमुळे हैराण आहेत. कल्याण रेल्वे स्थानक भागात स्मार्ट सिटी प्रकल्पातून कामे सुरू आहेत. या प्रकल्पाच्या ठिकाणी अडथळा नको म्हणून केडीएमटीच्या बस करसन चौकातून सोडल्या जात असल्याचे समजते.

# 'हिजाब घातल्यावर नोकरी कोण देईल?', मुंबईतील महाविद्यालय हिजाब बंदीवर ठाम!

**■ मुंबई: सचिन कदम**
**चेंबूरमध्ये आर्चाय मराठे महाविद्यालयात हिजाब आणि बुरखाबंदी करण्यात आली आहे. याप्रकरणी तक्रार आल्यानंतर महाविद्यालय व्यवस्थापनाने कॅम्पस प्लेसमेंट आणि विद्यार्थ्यांमध्ये शिष्टाचार आणण्याकरता हा निर्णय घेतला असल्याचं म्हटलं आहे. फ्री प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं.**

'हा विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न आहे. आम्हाला कॉलेजमध्ये प्लेसमेंट वाढवायची आहे. विद्यार्थी बुरख्यात नोकरी शोधायला गेले तर त्यांचा विचार केला जाईल का? समाजात कसे राहायचे आणि कसे वागायचे याबाबतचे मूल्य आणि शिष्टाचार विद्यार्थ्यांनी आत्मसात केले पाहिजे', असं आचार्य कॉलजेचे गर्व्हनिंग काऊन्सिलचे सरचिटणीस आणि ठाकरे गटाचे नेते सुबोध आचार्य यांनी फ्री प्रेस जर्नलला स्पष्ट केले.

मुंबईतील इतर पदवी महाविद्यालयांमध्ये असे कोणतेही बंधन नसताना धार्मिक पोशाखांवर बंदी घालण्याची गरज महाविद्यालयाला का वाटली, असे विचारले असता आचार्य म्हणाले, 'आमचे विद्यार्थी गरीब कौटुंबिक पार्श्वभूमीतील आहेत. त्यांना समाजात स्थान मिळावे अशी माझी इच्छा आहे.'

कॉलेजने बुरखाबंदी केल्याचं वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर कॉलेजने पदवीधर विद्यार्थ्यांसाठी एक ड्रेस कोड ठेवला असल्याचं म्हटलं आहे. यानुसार, धर्मानुसार कपडे परिधान करण्यावर बंदी घालण्यात आली आहे. यामध्ये विशेषतः हिजाब, निकाब



आणि बुरख्याचा उल्लेख आहे. संस्थेने गेल्या वर्षी त्यांच्या कनिष्ठ महाविद्यालयात हिजाबवर अशीच बंदी आणून गणवेश आणला होता. परंतु, कॉलेजच्या या निर्णयाविरोधात मुस्लीम विद्यार्थ्यांनी विरोध केला. ड्रेस कोड भेदभावपूर्ण आहे आणि त्यांच्या वैयक्तिक स्वातंत्र्याचे आणि धार्मिक स्वातंत्र्याचे उल्लंघन करते, असं विद्यार्थ्यांचं म्हणणं आहे. तसंच, या आठवड्यात विद्यार्थ्यांच्या एका गटाने महाविद्यालयाच्या मुख्याध्यापकांची भेट घेतली आणि संस्थेला आपल्या निर्णयावर पुनर्विचार करण्याची विनंती करणारे पत्र सादर केले. त्यांनी राज्य आणि राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाकडे तक्रारही केली आहे. एका विद्यार्थिनीने महाविद्यालयाला कायदेशीर नोटीसही बजावली होती.ही अतिरेकी विचारसरणी

या वादावर सुबोध आचार्य म्हणाले की या विषयाला 'धार्मिक रंग' देऊ नये. आमच्याकडे अजूनही विद्यार्थी कॉलेजमध्ये येत आहेत. खरं तर, अनेक पालकांनी मला भेटून निर्णयाबद्दल आभार मानले. हिजाब घालण्याच्या विद्यार्थ्यांच्या आग्रहालाही त्यांनी 'अतिवाद' म्हटले. 'तुम्हाला शिक्षकाने विद्यार्थ्यांचा धर्म त्यांच्या कपड्यांवरून ओळखावा असे वाटते का?' ते पुढे म्हणाले, 'विविधतेचा विचार तुम्ही कुठपर्यंत नेणार? हा मनुवाद किती दिवस चालवणार? ही एक अतिरेकी विचारसरणी आहे. मी याच्या विरोधात आहे.' आचार्य यांच्या 'सांप्रदायिक' आणि 'वर्गवादी' वक्तव्याबद्दल मुस्लिम समाजातील लोकांनी त्यांच्यावर टीका केली. 'हिजाब बंदीची कारणे पूर्णपणे निराधार आहेत. एक तर सर्व मुलींना प्लेसमेंटमध्ये भाग घ्यायचा नाही. त्यांच्यापैकी अनेकांना स्वतःचा उद्योग सुरू करायचा आहे.

# गेल्या पाच वर्षांत राज्यात डेंग्यूच्या रुग्णांमध्ये वाढः मात्र मृत्यूच्या संख्येत घट

**■ मुंबई: यश सावंत**

राज्यात मागील पाच वर्षांत डेंग्यूच्या रुग्णांमध्ये सातत्याने वाढ झाली आहे. मात्र मृत्यांच्या संख्येत घट होत असल्याने आरोग्य विभागाच्या प्रयत्नांना यश मिळत असल्याचे दिसून येत आहे. डेंग्यूच्या रुग्णांच्या संख्येत २०१९ च्या तुलनेत २०२३ मध्ये पाच हजारांनी वाढ झाली आहे. तसेच १ जानेवारी ते ३० एप्रिल २०२३ मध्ये डेंग्यूचे ८१४ रुग्ण आढळले होते. यावर्षी याच कालावधीत १४३५ रुग्ण आढळले आहेत. वाढते तापमान, वातावरण बदल, शहरीकरण यामुळे डेंग्यूचा प्रसार करणाऱ्या एडीस या डासांची पैदास मोठ्या प्रमाणात होत आहे. मागील पाच वर्षांमध्ये राज्यात डेंग्यूचे सर्वाधिक रुग्ण २०२३ मध्ये आढळले आहेत. राज्यात २०१९ मध्ये १४ हजार ८८८ रुग्ण सापडले होते, तर ४९ जणांचा मृत्यू झाला होता. मात्र त्यानंतर करोनामुळे डेंग्यूच्या रुग्णांच्या



संख्येत घट झाल्याचे निदर्शनास आले. मात्र त्यानंतर पुन्हा २०२१ मध्ये डेंग्यूच्या रुग्णांच्या संख्येत वाढ झाली. २०२१ मध्ये १२ हजार ७२० रुग्ण आढळले, तर ४२ जणांचा मृत्यू झाला होता. २०२२ मध्ये ८ हजार ५७८ रुग्ण सापडले आणि २७ जणांचा मृत्यू झाला होता. २०२३ मध्ये १९ हजार २९ रुग्ण सापडले आणि २१ जणांचा मृत्यू झाला होता. डेंग्यूच्या रुग्णांच्या संख्येत प्रत्येक वर्षी वाढ होत आहे. मात्र त्याच वेळी मृतांच्या संख्येत घट झाल्याचे निदर्शनास आले आहे. दरम्यान, गतवर्षी जानेवारी – एप्रिल या कालावधीमध्ये राज्यात डेंग्यूचे ८१४ रुग्ण आढळले होते. तर जानेवारी – एप्रिल २०२४ या कालावधीत एक हजार ४३५ रुग्णांची नोंद झाल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली.

## घाटकोपर दुर्घटनेतील दोषी जाहिरात कंपनीचे आणखी आठ फलक दादरमध्ये, पालिका प्रशासनाची पश्चिम रेल्वेला नोटीस

**■ मुंबई: सम्यक कासारे**

घाटकोपर दुर्घटनेत दोषी आढळलेल्या इगो मीडिया या जाहिरात कंपनीचे दादरच्या टिळक पूल परिसरात आठ फलक असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यापैकी एका फलकाची लांबी ८० आणि रुंदी १०० फूट आहे. हे आठ फलक तीन दिवसांत काढून टाकावेत, अशी नोटीस पालिका प्रशासनाने पश्चिम रेल्वेला पाठवली आहे.आपात्कालीन व्यवस्थापन कायद्यांतर्गत ही नोटीस बजावली असून तीन दिवसात फलक न काढल्यास पालिका ते निष्कासित करील आणि त्याचा खर्च रेल्वेकडून वसूल करण्यात येईल, असे या नोटीसीत म्हटले आहे. घाटकोपर दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर पालिकेने मुंबईतील सर्वच फलकांची माहिती गोळा केली आहे. मुंबईमधील रेल्वेच्या हद्दीतील एकाही जाहिरात फलकासाठी पालिकेची परवानगी घेण्यात आलेली नाही. तसेच पालिका प्रशासनाकडे जाहिरात शुल्कही भरण्यात येत नाही. मुंबईत जास्तीत जास्त ४० फूट बाय ४० फूट आकाराच्या जाहिरात फलकाला मुंबई महापालिका प्रशासन परवानगी देत असते. मात्र रेल्वेच्या हद्दीतील जाहिरात फलक त्यापेक्षा मोठे आहेत. काही ठिकाणी लांबी रुंदी १२० फूट म्हणजेच १४ हजार चौरस फुटाचे महाकाय क्षेत्रफळ असलेले जाहिरात फलक उभारण्यात आले आहेत. या फलकांना पालिकेची परवानगी नाही.



त्यामुळे हे फलक पालिकेच्या लेखी बेकायदेशीर आहेत. पालिकेच्या हद्दीतील एकूण १७९ जाहिरात फलकांपैकी महाकाय अशा फलकांची माहिती पालिकेने गोळा केली आहे. त्यात ४५ ठिकाणी महाकाय फलक असल्याचे आढळून आले आहेत. हे महाकाय फलक ताबडतोब हटवावे यासाठी पालिका प्रशासनाने रेल्वेला नोटीस पाठवली आहे. हे फलक न हटवल्यास आपत्कालीन व्यवस्थापन कायद्यांतर्गत ते हटवण्यात येतील, असा इशारा पालिका प्रशासनाने दिला आहे.

## मुंबई विमानतळावरील प्रवाशांच्या संख्येत ९ टक्क्यांनी वाढ; एप्रिल महिन्यात ४३ लाख प्रवाशांनी केला प्रवास



**■ मुंबई: नितीन देवळेकर**

मुंबईमधील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरून (सीएसएमआयए) देशांतर्गत व विदेशा जाणाऱ्या-येणाऱ्या प्रवाशांच्या संख्येत सातत्याने वाढ होत आहे. मुंबई विमानतळावरून एप्रिल २०२४ मध्ये ४३ लाख ६० हजार प्रवाशांनी प्रवास केला. एप्रिल २०२३ तुलनेत यात ९ टक्क्यांनी वाढ झाली असून एप्रिल २०२२ च्या तुलनेत ही वाढ ४२ टक्के आहे. मुंबई विमानतळाने एप्रिल २०२४ मध्ये १९ हजार ८९२ देशांतर्गत, तर ६ हजार ९७८ आंतरराष्ट्रीय पातळीवर अशी एकूण २६ हजार ८७० विमानांची ये-जा झाली. एप्रिल २०२२ (२१,५९७) च्या तुलनेत यात २४ टक्क्यक्नी आणि एप्रिल २०२३ (२५,४७७)च्या तुलनेत ५ टक्क्यांनी वाढ झाली. १४ एप्रिल रोजी या एका दिवसात सर्वाधिक प्रवासी वाहतूक झाली. तब्बल एक लाख ५६ हजार ७९३ प्रवाशांनी प्रवास केला. त्यामध्ये एक लाख १३ हजार ५४० देशांतर्गत आणि ४३ हजार २५३ आंतरराष्ट्रीय प्रवाशांचा समावेश होता.

## आयटी, वाहन उद्योगानंतर वैद्यकीय केंद्रामुळे ओळख

**■ पुणे: अभिजीत येरल्लू**

राज्यात मुंबईनंतर महत्त्वाचे महानगर अशी पुण्याची ओळख आहे. माहिती-तंत्रज्ञान (आयटी), वाहन उद्योग अशी पुण्याची ओळख आहे. त्यात आता वैद्यकीय केंद्र अशी नव्याने ओळख होऊ लागली आहे. करोना आणि त्यानंतर पुण्याच्या आसपासच्या जिल्ह्यांतून पुण्यात उपचारांसाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या वाढली आहे. परिणामी पुण्यातील वैद्यकीय यंत्रणेवरील ताणही वाढला आहे.

शहरात ससून, आरोग्य विभागाचे औंध येथील जिल्हा रुग्णालय आणि महापालिकेचे कमला नेहरू, तर पिंपरी-चिंचवड महापालिकेचे यशवंतराव चव्हाण अशी चार प्रमुख सार्वजनिक रुग्णालये आहेत. ग्रामीण भागातही सरकारी रुग्णालये आहेत. याशिवाय शहरासह जिल्ह्यात सुमारे ७८० खासगी रुग्णालयांचे मोठे जाळे आहे. यांमध्ये सुमारे १८ हजार ९०० साध्या, अडीच हजार अतिदक्षता, तर कृत्रिम श्वसन यंत्रणेची सुविधा असलेल्या ८०० खाटा आहेत. पुणे महापालिकेचे



वैद्यकीय महाविद्यालय आणि कमला नेहरू रुग्णालय अशी संयुक्तपणे रुग्णांना सेवा दिली जाते. येथे अतिदक्षता विभागात १७ खाटा असून, दररोज पाच ते आठ रुग्ण दाखल होतात. औंध जिल्हा रुग्णालयामध्ये सर्व विभाग मिळून ३०० खाटांची सुविधा आहे. करोनाकाळात जिल्ह्याच्या ग्रामीण भागासह नगर, पश्चिम महाराष्ट्रातून अनेक रुग्ण पुण्यात उपचारासाठी दाखल होत होते. तेव्हा राज्य सरकारच्या पुण्यातील आरोग्य यंत्रणेने कात टाकली होती. पुण्याची वाढती लोकसंख्या, ग्रामीण रुग्णालयांमध्ये असलेल्या अपुऱ्या सुविधा यामुळे शहरातील रुग्णालयांवर क्षमतेपेक्षा जास्त ताण येत आहे. पंतप्रधान आवास योजनेंतर्गत शहरातील वडगाव, हडपसर आणि खराडी येथील सुमारे २६५० घरांचे लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते गेल्या वर्षी करण्यात आले. या योजनेंतर्गत उपलब्ध घरे आणि प्राप्त अर्ज यांत मोठी तफावत आहे. त्यामुळे या योजनेची व्याप्ती वाढविण्याची नागरिकांची मागणी आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रात ९३८ घरांसाठी लाभार्थी निश्चित करण्यात आले आहेत. जिल्ह्याच्या ग्रामीण भागात जिल्हा परिषदेच्या वतीने सुमारे १५ हजार घरे मंजूर असून, त्यांपैकी ११ हजारांपेक्षा जास्त घरे तयार झाली आहेत. याशिवाय पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) पंतप्रधान आवास योजनेंतर्गत स्वतःच्या मालकी जागेवर वैयक्तिक घरकुल बांधण्यासाठी १९ हजार लाभार्थ्यांना मंजुरी देण्यात आली आहे.

# लोखंड पोलाद बाजारातील गोदामात गुटख्याची साठवणूक

**■ नवी मुंबई: धनश्री सट्टा**

कळंबोली येथील लोखंड पोलाद बाजाराच्या गोदामामध्ये यापूर्वी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी धाड टाकून लाखो रुपयांचा मद्यसाठा जप्त केला होता. दोन दिवसांपूर्वी लोखंड पोलाद बाजारातील गोदाम क्रमांक ४४९ मध्ये ४ लाख ८१ हजार ५०४ रुपयांचा गुटख्याचा साठा नवी मुंबई पोलिसांना सापडल्याने लोखंड पोलाद बाजारातील काळेधंदे पुन्हा एकदा उजेडात आले आहेत. नवी मुंबई पोलीस दलाचे आर्थिक गुन्हे प्रतिबंध शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त धनाजी क्षीरसागर यांना कळंबोली येथील लोखंड पोलाद बाजारात अत्ताऊल्ला शेठ याच्या गोदामामध्ये प्रतिबंधित गुटख्याचा मोठा साठा असल्याची माहिती मिळाली होती. त्यानंतर नवी मुंबई पोलीस दलाच्या अंमलीपदार्थ विरोधी कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक निरज चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश धुमाळ, पोलीस हवालदार ज्ञानेश्वर बनकर, उत्तम लोखंडे, गणेश पवार, पोलीस नाईक संजय फुलकर यांच्या पथकाने सापळा रचून केलेल्या कारवाईमध्ये अताऊल्ला याच्या गोदामामध्ये प्रतिबंधित गुटखा, पानमसाला,



तंबाखुचा साठा आढळला. यापूर्वीसुद्धा याच परिसरात मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटख्याचा साठा अन्न औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी पकडला होता. त्यानंतरसुद्धा अताऊल्ला याने गुटख्याचा साठा केल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. अताऊल्ला याला पोलीस आणि अन्न औषध प्रशासन विभागातील काही कर्मचाऱ्यांची साथ असल्याने वारंवार कारवाई होऊनही पनवेल, कळंबोली, कामोठे, तळोजा या परिसरात राजरोज पानटपऱ्यांवर गुटख्याची विक्री सुरु आहे. नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी नशामुक्त नवी मुंबई ही मोहीम हाती घेतली. या मोहिमेअंतर्गत पोलिसांचे अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे पथक अंमली पदार्थ विकणाऱ्यांना पकडत आहे. मात्र पोलीस व अन्न औषध प्रशासन विभागातील काही नतद्रष्ट कर्मचाऱ्यांमुळे अंमलीपदार्थ पकडण्यासाठी नेमलेल्या पोलिसांना गुटखा विक्रीकडे लक्ष्य केंद्रित करावे लागत आहे. अताउल्ला याची सखोल चौकशी केल्यावर त्याने एवढा मोठा गुटख्याचा साठा कुठून आणला. तसेच गोदामात पोलिसांनी धाड टाकण्यापूर्वी आणि धाड टाकल्यानंतर त्याने कोणकोणत्या पोलिसांना व सरकारी अधिकाऱ्यांना संपर्क केला याची सखोल चौकशी केल्यास पनवेलचा अवैध गुटखा व्यापारावर काही प्रमाणात प्रतिबंध लागू शकेल.

# वीस रूपयांसाठी पोलिसाने दुकान दाराचे नाक फोडले

**■ विरार: गणेश बागडे**

मेहनतीच्या वीस रुपयांच्या मजूरीसाठी एका गरीब दुकान दारास पोलीस कर्मचाऱ्याने बेदम मारहाण करीत नाक फोडल्याची घटना गुरुवारी माणिकपुर पोलीस ठाण्यात घडली. या नंतर जखमी दुकानदाराने पोलीस तक्रार देण्याचा प्रयत्न केला असता, त्यास अधिकारी वर्गाने पिटाळून लावले. पोलिसांच्या या मग्रुरी विरोधात पोलीस अधीक्षक मधुकर पांडे यांच्याकडे तक्रार निवेदन सादर करण्यात आले आहे.

अधिक माहिती नुसार, मोहम्मद अली अन्सारी (३३) रा. माणिकपुर यांचा माणिकपूर पोलीस स्टेशनच्या समोर चावी बनवण्याचा व्यवसाय आहे मागील पंधरा वर्षांपासून अन्सारी येथे व्यवसाय करतात. त्यावर त्यांच्या कुटुंबाचा चरितार्थ चालतो. गुरुवार दिनांक १६ रोजी दुपारी साडेबारा वाजताच्या सुमारास एक व्यक्ती दोन चाव्या बनवण्यासाठी या ठिकाणी आली होती. सदर चाव्यांचे ८० रुपये मजुरी होत असल्याचे सांगण्यात आले.

चाव्या बनवून झाल्यानंतर आपण पोलीस असल्याची बतावणी करून केवळ ६० रुपये देऊन सदरच्या व्यक्तीने अन्सारी यांना दमदाटी केली. या बाबतचा वाद समोरच्याच माणिकपूर पोलीस स्टेशनमध्ये गेला असता, सदर ठिकाणी कर्तव्यावर ठाणे अंमलदार असलेले राजशेखर सरगरे यांना अन्सारी यांनी झालेला प्रकार सांगितला. वास्तविक पाहता उर्वरित वीस रुपये सदर व्यक्तीने देणे आवश्यक असतानाही सरगरे यांनी




उलटपक्षी अन्सारी यांना शिवीगाळ दमदाटी करीत पोलीस ठाण्यातच मारहाण सुरू केली. या मारहाणी दरम्यान त्यांच्या नाकावर जोरात प्रहार केल्याने अन्सारी रक्तबंबाळ झाले. या घटनेनंतर भांबावलेल्या अन्सारी यांनी पोलीस निरीक्षक राजू माने यांना झालेला प्रकार कथन केला 'आपल्याला तक्रार द्यायची असून माझी तक्रार घेतली जात नाही' अशी कैफियत अन्सारी यांनी मांडली परंतु पोलिसांनी तक्रार घेण्यास टाळाटाळ केली. रक्तस्त्राव जास्त झाल्यामुळे त्यांनी पारनाका येथील सर डी एम पेटीट रुग्णालय गाठले. रुग्णालयात उपचार घेतल्यानंतर अन्य उपचारासाठी निदान सिटी स्कॅन येथे जाऊन चाचण्या केल्या. यात नाकाचे हाड तुटून गंभीर दुखापत झाल्याचे निष्पन्न झाले. चावी बनवण्यासाठी आलेली व्यक्ती ही रेल्वे पोलीस कर्मचारी असल्याचे निष्पन्न झाले आहे.

# इथेनॉलवरील निर्बंध केंद्राकडून मागे; तेल कंपन्यांकडून लवकरच खरेदी

**■ मुंबई: प्रथमेश चव्हाण**

उसाचा रस किंवा मळीपासून इथेनॉल निर्मितीवरील निर्बंध केंद्र सरकारे हटविले असून देशभरातील कारखान्यांकडे शिल्लक असलेले सुमारे तीन हजार कोटींचे इथेनॉल खरेदी करण्याचे आदेश पेट्रोलियम कंपन्यांना दिले आहेत. त्यानुसार राज्यातील सुमारे ११०० कोटींचे इथेनॉल खरेदी करण्याची प्रक्रिया पेट्रोलियम कंपन्यांनी सुरू केली असून त्यासाठी निविदाही काढण्यात आल्याची माहिती मंत्रालयातील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. देशातील साखरटंचाई आणि साखरेच्या दरातील चढउतार टाळण्यासाठी केंद्र सरकारने ६ डिसेंबर २०२३ रोजी उसाचा रस आणि बी- हेवी मोलाईसेस( मळी) पासून इथेनॉल उत्पादन आणि खरेदीवर बंदी घातली होती. केंद्राने ही बंदी घातली त्या वेळी देशभरात सुमारे पाच ते सात लाख टन मळीचा (बी- हेवी मोलाईसेस) साठा शिल्लक होता. एकट्या महाराष्ट्रात उसाचा रस, मळीचा सुमारे ११०० कोटींच्या किमतीचा साठा गेल्या सहा महिन्यांपासून शिल्लक आहे. त्याचे वेळीच इथेनॉलमध्ये रूपांतर केले झाले नाही तर हा साठा वाया जाणार आहे. याची उपयुक्तता संपण्यापूर्वी इथेनॉल निर्मितीस परवानगी देण्याची विनंती राज्य साखर संघ आणि राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे केली होती. राज्य साखर संघाचे अध्यक्ष पी.आर. पाटील आणि व्यवस्थापकीय संचालक संजय खताळ यांनी याबाबतची समस्या केंद्राच्या निदर्शनास आणून दिली. राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनीही सहकारमंत्री अमित शहा यांची



भेट घेऊन इथेनॉल निर्मितीवरील निर्बंध उठविण्याची मागणी केली होती. त्या वेळी देशातील साखर हंगाम संपल्यानंतर याबाबत विचार करण्याची ग्वाही शहा यांनी दिली होती. देशातील साखर हंगाम संपल्यानंतर आता हे निर्बंध हटविण्यात आले असून देशभरात कारखान्यांकडे शिल्लक असलेल्या ऊस रस आणि मळीपासून तयार होणारे इथेनॉल खरेदी करण्याचे आदेश पेट्रोलियम कंपन्याना दिले आहेत. त्यानुसार इंडियन आइल कॉर्पोरेशन, भारत पेट्रोलियम, हिंदुस्थान पेट्रोलियम, मंगलोर रिफायनरी अँड पेट्रोकेमिकल्स लि. या तेल कंपन्यांनी पहिल्या टप्प्यात सुमारे ६६ कोटी लिटर इथेनॉल खरेदी करण्यासाठी निविदा प्रसिद्ध केली असून त्यानुसार कारखान्यांनी देकार सादर करायचे आहेत. सध्या कारखान्यांकडे शिल्लक असलेल्या मळी आणि उसाच्या रसापासून इथेनॉल निर्मिती करून त्याचा पुरवठा कारखान्यांनी तेल कंपन्यांना करायचा आहे.

# मुंबई ते मांडवा जलवाहतुक २६ मे पासून बंद होणार

**■ अलिबाग: रघुवीर जाधव**

मुंबई ते मांडवा दरम्यान चालणारी जलवाहतुक सेवा २६ मे पासून बंद होणार आहे. पावासाळ्याच्या पार्श्वभुमीवर खबरदारी म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबतचे परिपत्रक मेरीटाईम बोर्डाने जारी केले आहे. दरम्यान भाऊचा धक्का ते मांडवा दरम्यान चालणारी रो रो जलवाहतुक सेवा नियमितपणे सुरु राहणार आहे. मुंबईतील गेट वे ऑफ इंडीया ते मांडवा दरम्यान जल प्रवासी वाहतुक केली जाते. पिएनपी, मालदार आणि अजंठा अशा तीन खाजगी ऑपरेटर्स मार्फत जल वाहतूक सेवा पुरवली जाते. दरवर्षी या मार्गावरून साधारणपणे १२



लाख प्रवासी मार्गावरून ये जा करत असतात. कोकणातील सर्वाधिक प्रवासी संख्या असलेला हा जलमार्ग म्हणून ओळखला जातो. या शिवाय या मार्गावरून खाजगी स्पीड बोटींची मोठ्या प्रमाणात वाहतुक सुरु असते. पावसाळ्यात प्रवाश्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून ही जल वाहतूक बंद ठेवण्यात येते. या काळात समुद्र खळवळलेला असल्याने बोटींना धोका उद्भवू शकतो त्यामुळे खबरदारी म्हणून तीन महिने ही बोट सेवा बंद ठेवण्यात येत असते. यंदा २६ मे पासून या मार्गावरील सर्व बोटसेवा बंद करण्याचे निर्देश मेरीटाईम बोर्डाने दिले आहेत. त्यानुसार गेट वे ऑफ इंडीया ते मांडवा दरम्यान चालणारी बोट सेवा बंद करण्यात येणार आहे.

# विठ्ठल भक्तांसाठी आनंदाची वार्ता! श्री विठ्ठल रुक्मिणीमातेचे पदस्पर्श दर्शन २ जून पासून सुरू होणार

■ पंढरपूर: माधव अलवा

येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर संवर्धन व जीर्णोद्धार कामे पूर्णत्वास येत आहेत. त्यामुळे विठ्ठल आणि रूक्मिणीमातेचे पदस्पर्श दर्शन दिनांक २ जून पासून सुरू करण्यात येणार असल्याची माहिती श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर समितीचे सह अध्यक्ष ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली आहे. सध्या रोज पहाटे ५ ते सकाळी ११ वाजेपर्यंत देवाचे लांबून दर्शन सुरू आहे. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदीर संवर्धन कामांबाबत तसेच आषाढी यात्रापुर्व नियोजनाबाबत मंदिर समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस सदस्या शकुंतला नडगिरे, डॉ. दिनेशकुमार कदम, संभाजी शिंदे, ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर, ॲड. माधवी निगडे, ह.भ.प. प्रकाश जवंजाळ, अतुलशास्त्री



भगरे गुरुजी, ह.भ.प. शिवाजीराव मोरे तसेच कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक बालाजी पुदलवाड, पुरातत्व विभागाचे सहाय्यक संचालक विलास वाहने, वास्तुविशारद तेजस्विनी आफळे, ठेकेदार रमेश येवले व सर्व खाते प्रमुख उपस्थित होते. यावेळी सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर म्हणाले, श्री विठ्ठल गाभारा व रुक्मिणी गाभारा येथील संवर्धनाचे काम करतेवेळी मूर्तीच्या संरक्षणास कुठल्याही प्रकारची बाधा येणार नाही, याची दक्षता घेऊन तसेच मूर्ती संरक्षणास प्राधान्य देऊन कामास सुरुवात करण्यात आली. सदरचे काम करत असताना काही नव्याने कामे निदर्शनास आल्याने या कामांसाठी ४५ दिवसांपेक्षा जास्त कालावधी लागला आहे. सदरचे काम पूर्णत्वास येत असून, संवर्धनाचे काम दर्जेदार व पुढील अनेक वर्ष टिकेल या दृष्टीने करण्यात आले आहे. याशिवाय, २ जून पासून भाविकांच्या शुभहस्ते पूजा देखील सुरू करण्यात येणार आहेत. तसेच आषाढी यात्रेच्या अनुषंगाने करावयाच्या नियोजनाचा आढावा घेऊन भाविकांना अधिकाधिक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना त्यांनी यावेळी केल्या. असे असले तरी भाविकांना आपल्या लाडक्या विठुरायाच्या पायावर डोके ठेऊन दर्शन घेता येणार आहे.

# कोकणात १ जूनपासून सागरी मासेमारीवर बंदी, मत्स्यव्यवसाय विकास विभागाचे आदेश

■ अलिबाग: माधव अलवा

**कोकण किनारपट्टीवर १ जून ते ३१ जुलै या कालावधीत खोल समुद्रात मासेमारी करण्यावर बंदी घालण्यात आली आहे. मत्स्यव्यवसाय विभागाने याबाबतचे आदेश जारी केले आहेत. बंदी काळात मासेमारी करणाऱ्या मच्छीमारांवर कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे.**

या कालावधीमध्ये मासळी व सागरी प्राण्यांचे मोठया प्रमाणात प्रजनन होत असते. तसेच समुद्रात नद्यांव्दारे मोठया प्रमाणात खनिजद्रव्य वाहत जातात. त्याचप्रमाणे क्षारतेचे प्रमाण कमी होते आणि समुद्राच्या तळातील मुलद्रव्ये पाण्याच्या वरच्या थरात येतात. त्यामुळे प्लवंग निर्मिती मोठया प्रमाणावर होऊन मासळीच्या लहान जीवांना पोषक वातावरण तयार होते. परिणामी मासळीच्या साठयाचे जतन होते. त्याशिवाय या कालावधीत वादळी हवामान असल्याने जिवीत व वित्त हानी होण्याची शक्यता असते. त्यापासून मच्छिमारांचे संरक्षण व्हावे या हेतूने वरील कालावधीत यांत्रिक



मासेमारी नौकांना मासेमारीस बंदी घालण्यात आलेली आहे. या आदेशाचा भंग करून मासेमारी केल्यास, मच्छीमारांवर कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा मत्स्यव्यवसाय विभागाने दिला आहे. या कालावधीत यांत्रिक नौका मासेमारीस गेल्या असता अपघात झाल्यास त्यासंबंधीची कोणतीही नुकसान भरपाई शासनाकडून मिळणार नाही, नौका पुनर्वसनासंबंधीचा प्रस्ताव विचारात घेण्यात येणार नाही, बंदी कालावधीत अपघाताने मच्छिमारांवर मृत्यू ओढवल्यास त्याच्या वारसांना कोणत्याही प्रकारची मदत अथवा अर्थसहाय्य शासनाकडून मंजूर केले जाणार नाही, शासनाच्या कोणत्याही अर्थसहाय्याच्या योजनांचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही, बंदी कालावधीत बेकायदेशीर मासेमारी करणाऱ्या नौका मालकांविरुध्द कायदेशिर कारवाई करण्यात येईल असा इशारा मत्स्यव्यवसाय विभागाने जारी केलेल्या प्रसिध्दी पत्रकात देण्यात आला आहे. मच्छीमारी बंदीबाबत राज्य शासनाकडून मत्स्यव्यवसाय आयुक्तांनी आदेश जारी केले आहेत. ते आमच्या कार्यालयाला प्राप्त झाले आहेत.

# लाच मागणारा तलाठी गजाआड, लाचलुचपत विभागाची कारवाई

■ धाराशिव: रघुवीर जाधव

भावाच्या नावे खरेदी केलेल्या शेतजमिनीचा फेरफार करण्यासाठी चार हजाराची लाच मागून तीन हजार रुपये स्वीकारणाऱ्या लाचखोर तलाठ्याच्या विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. कल्याण राठोड असे लाचखोर तलाठ्याचे नाव आहे.



भावाच्या नावे खरेदी केलेल्या शेत जमिनीची नोटीस काढून फेरफारला नोंद करण्यासाठी चक्क चार हजार रुपयांच्या लाचेची मागणी करण्यात आली. ही सगळी प्रक्रिया करण्यासाठी त्याचबरोबर साहेबालाही काही रक्कम देण्यासाठी पैसे द्यावे लागतील असे म्हणून कळंब तालुक्यातील इटकूर सज्जा येथे तलाठी असलेल्या कल्याण शामराव राठोड (वय ४३) याने दिनांक १४ मे रोजी तक्रारदाराकडे चार हजार रुपयांची मागणी केली. तरजोडीअंती तीन हजार रुपयांची रक्कम लाच म्हणून स्वीकारण्यासाठी तयारीही दर्शविली. याबाबत कळंब पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लाचखोर तलाठी राठोड यास ताब्यात घेण्यात आले आहे.

# ‘प्रफुल्ल पटेल म्हणायचे निवडणुकीत आपला पक्ष टिकणार नाही, त्यामुळे...’, शरद पवारांचं वक्तव्य; म्हणाले, ‘ते २००४ सालीच...’

■ मुंबई: सचिन कदम

गेल्या वर्षी जून २०२३ मध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात उभी फूट पडून दोन गट तयार झाले. अजित पवार यांनी पक्षातील ४२ आमदारांना आपल्याबरोबर घेत वेगळा गट बनवला. या गटासह ते भाजपा आणि शिवसेनेच्या (शिंदे गट) युतीत सहभागी झाले. तसेच अजित पवार यांच्या गटाने आपणच खरा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष असल्याचा दावा केला. यावरून दोन्ही गटांमध्ये वाद झाला आणि हा वाद निवडणूक आयोगाकडे गेला. त्यानंतर निवडणूक आयोगाने अजित पवारांच्या गटालाच मूळ राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष असल्याचा निकाल दिला. त्याचबरोबर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचं ‘घड्याळ’ हे निवडणूक चिन्ह देखील अजित पवारांच्या गटाला बहाल करण्यात आलं.

ते म्हणाले, ‘प्रफुल्ल पटेल हे २००४ सालापासूनच, किंबहुना त्या वर्षीच्या निवडणुकीच्या आधीपासूनच मला सतत येऊन म्हणायचे की, आपण भाजपात जाऊया. ते नेहमी म्हणायचे, यंदाच्या निवडणुकीत आपला पक्ष टिकणार नाही. देशात अटल बिहारी वाजपेयी यांना आता पर्याय नाही. त्यामुळे आपण सर्वजण भाजपात जाऊया. पटेल माझ्याकडे येऊन तासनतास आग्रह करत बसायचे. शेवटी मी त्यांना स्पष्टपणे नाही म्हणून सांगितलं. त्यानंतरही ते थांबले नाहीत. मग मी त्यांना सांगितलं की, हवं तर तुम्ही भाजपात जा. अखेर त्यांच्या डोळ्यात पाणी आलं.’ राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात जून २०२३ मध्ये फूट पडली असली तरी याआधी देखील हा पक्ष फुटण्याच्या मार्गावर होता. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर अजित पवारांनी काही आमदारांना आपल्याबरोबर घेत



भारतीय जनता पार्टीला पाठिंबा देत राज्यात सरकार स्थापन केलं होतं. मात्र हे सरकार केवळ दोन दिवस टिकलं. त्यानंतर अजित पवार माघारी फिरले. अजित पवार आणि त्यांच्या गटातील नेत्यांनी अनेकदा दावा केला आहे की शरद पवार हे २०१४ सालीच भाजपाबरोबर सरकार स्थापन करणार होते. दरम्यान, शरद पवार यांनी म्हटलं आहे की, ‘आमच्या पक्षातील प्रफुल्ल पटेल हे २००४ सालापासूनच भजपाबरोबर युती करण्यासाठी माझ्या मागे लागले होते.’ या मुलाखतीवेळी शरद पवार यांनी आणखी एका महत्त्वाच्या प्रश्नावर उत्तर दिलं. २००४ च्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जास्त आमदार असूनही मुख्यमंत्रिपद का नाकारलं? यावरही शरद पवार यांनी भाष्य केलं. पवार म्हणाले, ‘आम्हाला मुख्यमंत्रिपद मिळाल्यानंतर ते कोण चालवणार? याचा विचार आम्ही करत होतो.

# ‘उत्तम आरोग्यासाठी दुधाचा चहा टाळा’


■ मुंबई: सम्यक कासारे

चहाचे अधिक सेवन केल्यास रक्तदाब वाढतो, हृदयात अनियमितता येते. तसेच चहाचे सतत सेवन केल्यास लोहाची कमतरता निर्माण होते आणि अशक्तपणा जाणवतो. त्यामुळे दुधाचा चहा टाळावा, असे ‘आयसीएमआर’ने संशोधनाअंती जाहीर केले आहे. त्यामुळे दुधाचा चहा पिण्याचे टाळावे, तसेच चहा व कॉफीचे सेवन कधी करावे याबाबत ‘आयसीएमआर’ने मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद (आयसीएमआर) आणि राष्ट्रीय पोषण संस्थेने केलेल्या संशोधनामध्ये कॅफिनयुक्त पेयांमधील टॅनिन शरीरात लोह शोषण्यास अडथळा आणू शकतात. टॅनिन पोटातील लोहासाठी प्रतिरोधक असतात. त्यामुळे शरीरामध्ये लोहाची कमतरता व अशक्तपणासारखी स्थिती निर्माण होते. याव्यतिरिक्त, कॉफी आणि चहाचे जास्त सेवन केल्याने रक्तदाब वाढतो आणि ते हृदयाच्या अनियमिततेस कारणीभूत ठरते. ब्रूड कॉफीच्या १५० मिलीमध्ये ८० ते १२०



मिलीग्रॅम कॅफिन असते, तर इन्स्टंट कॉफीमध्ये ५० ते ६५ मिलीग्रॅम इतके कॅफिन असते. त्याचप्रमाणे चहामध्ये ३० ते ६५ मिलीग्रॅम कॅफिन असते. कॅफिनचे सेवन जास्त प्रमाणात करणे घातक असल्याचे आढळले आहे. आयसीएमआरने जास्त प्रमाणात चहा, कॉफी सेवन करण्यापासून सावध केले.

# मायमराठीचे आर्त...!




अवघा मराठी माणूस जसा संयुक्त महाराष्ट्रासाठी एकवटला होता, तसाच पुन्हा मराठीच्या मुद्द्यावर एकवटला, तर सत्ताधारी कोणीही असो, त्याला राजकीय इच्छाशक्ती दाखवून अभिजात दर्जा बहाल करावा लागेल.

यंदाच्या सार्वत्रिक निवडणुकीत मायमराठीच्या भवितव्याची ‘राजकीय’ काळजी व्यक्त झाली, हे एक अप्रुपच म्हणावे लागेल. मराठी भाषेचा विषय साहित्य संमेलनांच्या मांडवातून बाहेर पडून सार्वत्रिक निवडणुकीच्या रिंगणात आला, ही नोंद घेण्याजोगी घटना निश्चितच आहे. हे घडू शकले याचे कारण हळुहळू का होईना मराठीचा मुद्दा मतप्रभावी ठरण्याच्या अवस्थेत आल्याचे दिसते.

राजकीय नेत्यांनी याबाबत भरघोस आश्वासने दिली म्हणजे प्रश्न सुटलाच, असे नाही. पण तरीही त्यांच्या विषयपत्रिकेत निदान त्याला स्पर्श झाला, हेही नसे थोडके. निर्णयप्रक्रियेवर प्रभाव टाकायचा असेल तर जनमताचा रेटा तयार व्हावा लागतो. मराठीच्या मुद्यावर तसा तो थोडाफार का होईना तयार झाला, असा याचा अर्थ.

मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळण्याचा प्रश्न गेली नऊ वर्षे भिजत पडला आहे, सत्ताधारीच नव्हे, तर कुठल्याच पक्षाच्या अजेंड्यावर मायमराठीचे भवितव्य कधीच नव्हते, म्हणून हे असले वाळवण मराठीच्या नशिबी आले. अभिजात दर्जा मिळण्यासाठी केंद्र सरकारने काही निकष ठरवून दिले आहेत. त्यानुसार तमीळ, संस्कृत, तेलगू, उडिया या भाषांना आधीच हा दर्जा बहाल करण्यात आला आहे.

यंदा ‘‘आमच्या आघाडीचे सरकार सत्तेत आले, तर मराठी भाषेला अभिजात दर्जा लगेच मिळवून देऊ’’, असे आश्वासन कॉंग्रेस पक्षातर्फे जाहीरनाम्यात देण्यात आले. या पक्षाचे राष्ट्रीय नेते-प्रवक्ते जयराम रमेश यांनी यासंदर्भात समाजमाध्यमांवर जाहीर घोषणाही केली. कुणीतरी मराठी भाषेची राष्ट्रीय पातळीवर उठाठेव करु पाहाते आहे, हेच मुळी मराठीजनांच्या मनावर मोरपीस फिरवणारे! त्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कहर केला.

‘मराठी भाषेबद्दल माझ्या मनात नेहमीच जिव्हाळा राहिला आहे. या भाषेला प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहीन,’’ असे आश्वासन त्यांनीही देऊन टाकले. आणखी काय हवे? निवडणुकीच्या साठमारीत गुंतलेले हे दोन्ही राष्ट्रीय पक्ष एकच मराठी अभिमानगीत गाताना पाहून अनेकांना हुंदका दाटून आला असेल.

अभिजात दर्जा मिळण्यासाठीचे निकष मराठी भाषा पार करते, तांत्रिकदृष्ट्या मराठी भाषा या दर्जाला पूर्णतः पात्र ठरते, हे अनेकवेळा स्पष्ट झाले आहे. पण मुद्दा आहे तो राजकीय इच्छाशक्तीचा. तिथे मात्र सगळीच वानवा होती व आहे. भाषणाची सुरुवात मराठीतून करण्यासारखे काही हुकमी फंडे वापरण्याच्या प्रतीकात्मकतेकडून ठोस धोरणनिर्मितीकडे राज्यकर्त्यांना वळवणे, हे मराठीसाठी चळवळ करणाऱ्यांपुढचे आव्हान आहे.

अजून मोठी मजल मारायची आहे. मराठी भाषेचा प्रश्न हा मतांची बेगमी साधणारा किंवा गणिते बिघडवणारा मामला नाही, याची ठाम खात्री सगळ्याच राजकीय पक्षांना असल्याने आजवर मराठीची पर्वा करत बसण्याच्या भानगडीत कुणी पडले नव्हते. यंदा प्रथमच मराठीचा अभिजात दर्जा आणि भवितव्याचा कळवळा हा निवडणुकीचा मुद्दा बनल्याचे दिसत आहे. याचे स्वागत केले पाहिजे.

हा प्रश्न राजकीय इच्छाशक्तीच्या अभावाचा बनला होता, तो राजकीय भावाचा बनणे आवश्यक होते. याच मार्गाने हा प्रश्न निकालात निघू शकतो. अभिजात दर्जा मिळाल्यामुळे भाषेचे नेमके उन्नयन कसे होते, असा किरटा सूर अनेक जण काढत असतात. वर्तमानातली पिढीच आपल्या मातृभाषेचा धड वापर करत नाही, तर अभिजात दर्जा मिळून काय उपयोग? असा सर्वसाधारण सूर असतो.

तो अज्ञानमूलक आहे. मराठी भाषेची परवड आणि अभिजात दर्जा यांचा अर्थाअर्थी काहीही संबंध नाही. असलाच तर तो अप्रत्यक्ष स्वरुपाचा आहे. अभिजात दर्जा मिळाल्याने एखाद्या भाषेचे संशोधन, संवर्धन अधिक चांगल्या प्रकारे होऊ शकते. भाषेच्या विकासासाठी सरकारी तिजोरीतील अधिक पैसा ओतला जाऊ शकतो. मुळात राष्ट्रीय पातळीवर प्रतिष्ठा पावलेली भाषा ही ‘आपली’ मातृभाषा आहे, ही जाणीव समाजात बिंबवणे थोडे सोपे होते.

अभिजात दर्जा मिळाल्यानंतर आपोआपच मराठीतील साहित्य आणि दैनंदिन वापर यांच्यावर सकारात्मक परिणाम होईल. अर्थात हा लाभांश अत्यल्प असला तरी तो कमी लेखता येण्याजोगा नाही. मराठी भाषेला अभिजात दर्जापर्यंत पोचवण्यासाठी महाराष्ट्रातील मोजक्या विचारवंत आणि अभ्यासकांनी वेळोवेळी आवाज उठवला. पण राजकारणाच्या गदारोळात असल्या आवाजांचे डेसिबल कमीच पडतात.

निवडणुकीच्या रिंगणात हा मुद्दा आल्याने आशेला काही जागा निर्माण झाली आहे, असे वाटते खरे. निवडणुकीच्या अस्मानात आश्वासनांच्या अनेक रेवड्या-बत्तासे उडत असतात. त्यातले किती हाताला लागतात, आणि किती अस्मानातच विरतात, हे आपण सारे जाणतोच. मराठीचा मुद्दा तरी असल्या पोकळ आश्वासनगर्दीत वाहून जाता कामा नये. मराठीचे कितीतरी अभ्यासक आताशा या मुद्द्याबाबत अतिशय कडवट आणि क्वचित नकारात्मक झाले आहेत.

राजकीय नेत्यांच्या आश्वासनामुळे त्यांना पुन्हा थोडी उभारी यावी, आणि मराठीची चळवळ अधिक जोमाने वाढावी, असे वाटते. संयुक्त महाराष्ट्रासाठी अवघा मराठी माणूस जसा एकवटला होता, तसाच पुन्हा मराठीच्या मुद्द्यावर एकवटला, तर सत्ताधारी कोणीही असो, त्याला राजकीय इच्छाशक्ती दाखवून अभिजात दर्जा बहाल करावाच लागेल. ही काही खैरात नव्हे, तो मराठी माणसाचा जन्मसिद्ध हक्क आहे.

# चेहऱ्यावरील डाग, धब्बे, पिगमेंटेशन, सुरकुत्या घालवा ह्या उपायाने

तुम्ही जर आपल्या चेहऱ्यावरील पडलेल्या सुरकुत्या, सैल झालेली त्वचा, पिंपल्स येऊन गेल्यानंतर पडणारे खड्डे अशा त्रासाने चिंताग्रस्त असाल तर काळजी करू नका. आज आम्ही तुमच्यासाठी यावर घेऊन आलो आहोत एक अनोखा खात्रीशीर असा अत्यंत फायदेशीर उपाय. सलग पंधरा ते वीस दिवस हा उपाय केल्याने तुम्हाला खूप लाभ होईल.



स्वस्त, सोपा आणि घरगुती वस्तू पासून हा उपाय आपण करणार आहोत. त्यासाठी तुम्हाला काही वेगळे महागड्या वस्तूंची गरज नाही. हा उपाय करण्यासाठी आपल्याला लागणार आहे सदाफुली चे रोपाची पानं. चेहर्यासाठी आणि केसांसाठी सदाफुलीचे पाने, फुलं म्हणजे वरदान आहेत. त्याबद्दल फारशी लोकांना माहिती नसते. सदाफुलीचे काही पाने आणि फुले स्वच्छ पाण्याने धुऊन घ्यावी. थोडेसे पाणी घालून मिक्सरमधून याची बारीक पेस्ट बनवून घ्या. हा रस वस्त्रगाळ करून घ्यावा. ही वनस्पती अगदी सहजतेने कमी मेहनतीत लागते. बाराही महिने याला फुले येतात आणि हिरवेगार राहते ही वनस्पती.

उपाय १ : चेहऱ्यावर खूप पिंपल्स असल्यास / पिंपल्स गेल्यानंतर डाग आणि खड्डे राहिले असल्यास हा रस कापसाने चेहऱ्यावरील संबंधित जागेवर लावावा. हा रस फ्रिज मध्ये २-३ दिवस बनवून ठेवू शकता. सलग काही दिवस हा उपाय केल्याने पिंपल्सचे डाग राहत नाहीत.

उपाय २ : चेहऱ्यावर सुरकुत्या पडलेल्या असल्यास / त्वचा सैल झाली असल्यास-दोन चमचे या रसा मध्ये अर्धा चमचा ऑलिव्ह ऑइल घाला. ऑलिव्ह ऑइल नसल्यास विटामिन ई च्या कॅप्सूल च्या दोन गोळयातील तेल घाला. हे मिश्रण एकजीव करून हातानी चेहऱ्यावर लावून हलक्या हातानी मसाज करावा. अर्ध्यातासांनी चेहरा धुवा.

असे दिवसातून दोन वेळेस असलेला एक महिनाभर केल्यास लवकर परिणाम दिसतो. उपाय ३ : थोडं फुटकुळ्या डाग आणि थोडा यामुळे त्वचेला पडलेले खड्डे असल्यासऽ दोन चमचे सदाफुलीच्या पानांचा रस, अर्धा चमचा ऑलिव्ह ऑइल, अर्धा चमचा गुलाब पाणी, अर्धा चमचा मुलतानी माती पावडर हे मिश्रण एकत्र करून घ्या.

चेहऱ्यावर नीट पॅक लागेल असेल घट्ट पातळ असू द्या. हा पॅक चेहऱ्यावर लावा वाळेपर्यंत ठेवा. नंतर पाण्याने स्वच्छ पाण्याने चेहरा धुवा. सर्व प्रकारच्या त्वचेसाठी हा उपाय करू शकता. हे होता आजचा आपल्या त्वचेसाठी अत्यंत लाभदायक असा उपाय. सलग महिनाभर हा उपाय करून बघा तुमची त्वचा सुंदर टवटवीत डाग विहिरीत होईल.

# चाणक्य यांनी सांगितलेल्या या गोष्टींचा अवलंब केल्यास आयुष्यात घडू शकतात मोठे बदल

चाणक्य हे इतिहासातील एका महान विद्वानांपैकी एक होते. नंद घराण्याला सत्तेपासून दूर सारत चंद्रगुप्त मौर्यासारख्या सामान्य मुलाला चाणक्य यांच्या धोरणांमुळे सिंहासनावर बसता आलं. चाणक्य यांना अर्थशास्त्र आणि जीवनातील धोरणांसाठी ओळखलं जातं. त्यांनी दिलेले उपदेश आजही लागू होतात. त्यांनी सांगितलेल्या धोरणांचा अवलंब केल्यास आयुष्यात अनेक बदल होऊ शकतात. इंद्रियांवर नियंत्रण ठेवा: चाणक्य नीतिनुसार व्यक्तीने नेहमी आपल्या इंद्रियांना आपल्या नियंत्रणात ठेवावे. स्थळ, वेळ आणि क्षमता लक्षात घेऊन आपले ध्येय पूर्ण केले पाहिजे. यामुळे तुमचे काम नीट तर होईलच, पण तुम्ही नियमित आणि संयमी व्हाल.

कमी बोला, जास्त ऐका: चाणक्य यांच्या मते, श्रीमंत व्यक्तीचे अनेक मित्र असतात. कारण फक्त श्रीमंत व्यक्तीच जास्त ज्ञानी मानली जाते. चाणक्य यांच्या मते श्रवणाने



धर्माचे ज्ञान मिळते, अशी त्यांची धारणा होती. द्वेष जवळ येत नाही, आणि श्रवणाने ज्ञान प्राप्त होते. म्हणूनच तुम्ही बोलण्यापेक्षा जास्त ऐकले पाहिजे.

मेहनत घ्या: कोंबड्यांकडून अनेक गोष्टी शिकता येतात. उदाहरणार्थ, एखाद्याने नेहमी वेळेवर उठले पाहिजे. याशिवाय तुम्ही निर्भय असले पाहिजे. चाणक्य यांनी सांगितले आहे की, माणसाने मेहनत करून पैसे कमावले पाहीजेत. नातेवाईकांमध्ये मालमत्तेची योग्य वाटणी करावी. गैरमार्गाने आलेला पैसा टिकत नाही. स्वत:ची कामं स्वत: करा: आयुष्यात पुढे जाण्यासाठी स्वत:ची कामं स्वत: केली पाहीजेत. आपली कामं नेमाने केली पाहीजेत. तसेच काम केल्यानंतर समाधानी राहावे. कपटी माणसाचा मित्र होण्यापेक्षा मित्रच नसावा. लालची व्यक्तीला एखादं गिफ्ट देऊन संतुष्ट करा. मुर्ख व्यक्तीला आदर देऊन संतुष्ट करा. तर विद्वान व्यक्तीला सत्य सांगितल्याने समाधानी होतो.

# सिल्लोडजवळील शेतात अर्भकांचे अवशेष आढळले; छत्रपती संभाजीनगरमधील अवैध गर्भपात प्रकरणाचे धागेदोरे



■ **छत्रपती संभाजीनगर: विशेष प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर येथील पुंडलिकनगरात सुरू असलेल्या अवैध गर्भलिंग निदान केंद्रावर महानगर पालिकेच्या पथकाने छापा मारल्यानंतर या प्रकरणाचे धागेदोरे सिल्लोडपर्यंत पोहोचल्याचे प्रशासन, आरोग्य व पोलीस विभागाच्या कारवाईत स्पष्ट झाले. यामध्ये अवैध गर्भपात करून झाल्यानंतर मृत अर्भकाला सिल्लोडजवळील शेतात पुरून ठेवल्याचे उघडकीस आले. याप्रकरणात सतीश टेहरे, साक्षी सोमीनाथ थोरात, सविता सोमीनाथ थोरात, डॉ. रोशन काशिनाथ ढाकरे (रा सिल्लोड), गोपाळ विश्वनाथ कळंत्रे, नारायण आण्णा पंडित, अशी आरोपींची नावे आहेत. महानगरपालिकेचे मुख्य आरोग्य अधिकारी डॉ. पारस मंडलेचा यांच्या पथकाने पुंडलिकनगरमधील देवगिरी अपार्टमेंट येथे अवैध गर्भलिंग निदान होत असल्याच्या माहितीवरून छापा मारला. पुंडलिकनगर ठाण्यात त्यासंदर्भाने गुन्हा दाखल केला. त्या अंतर्गत सतीश टेहरे याला अटक केली.

टेहरे याने कबुली जबाबात दिलेल्या माहितीनुसार तो साक्षी थोरात व सविता थोरात यांना रुग्ण पुरवतो. साक्षी थोरातने गर्भलिंग निदान केल्यानंतर सिल्लोडमधील श्री हॉस्पिटलचे डॉ. रोशन ढाकरे यांच्याकडे पाठवायचे. डॉ. ढाकरे हा त्याच्या दवाखान्यात अवैध गर्भपात करून परिचारक (कंपांउडर) गोपाळ कळंत्रे व नारायण पंडित यांच्यामार्फत विल्हेवाट लावायचे. या माहितीवरून जिल्हा शल्यचिकित्सकांच्या सहकार्याने व पोलीस उपायुक्त – २ च्या आदेशाने पोलिसांनी डॉ. ढाकरे याच्या सिल्लोडच्या दवाखान्यात छापा मारला. डॉ. ढाकरेसह त्याचे गोपाळ कळंत्रे व नारायण पंडित यांना ताब्यात घेतले. नायब तहसीलदार गवळी यांच्या समक्ष नारायण पंडित याने त्याच्या शेतात पुरून ठेवलेले अवशेष काढून दिले, अशी माहिती पुंडलिकनगर पोलीस ठाण्याचे निरीक्षक राजेश यादव यांनी कळवली.

## नोकरीच्या शोधात मुंबईत आलेल्या तरुणीवर कारमध्ये बलात्कार, मारहाणही केल्याचा पीडितेचा आरोप

■ **मुंबई: विशेष प्रतिनिधी**

मुंबईतील वरळी येथे एका २४ वर्षीय तरुणीला नोकरीचं आमिष दाखवून तिच्यावर बलात्कार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. याप्रकरणी वरळी पोलिसांनी ५० वर्षीय आरोपी जोसेफ जेम्स झेवियर्सला अटक केल्याची माहिती वरळी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र काटकर यांनी दिली.

वरळी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ठाण्यातील रहिवासी असलेल्या पीडित तरुणीनं नोकरीसाठी एका पुरुष मित्राची मदत घेतली. पीडितेला मैत्रिणीनं जोसेफचा मोबाईल नंबर दिला. नोकरीसाठी त्याच्याशी संपर्क साधण्याचा सल्ला दिला. यानंतर पीडिताच्या मित्रानं तिला आरोपी जोसेफने खार येथे भेटायला बोलावलंय, असं सांगितलं. पीडिता ताबडतोब टॅक्सीनं खारला पोहोचली. तिथं जोसेफ आणि तिचा मित्र होते. यानंतर तिघेही एका हॉटेलमध्ये गेले. मद्यपान करून



मध्यरात्रीच्या सुमारास घराकडे निघाले होते. तरुणीचे मित्र निघून गेल्यानंतर ती एकटीच खार स्थानकाच्या दिशेनं चालली होती. विरोध केला असता मारहाण- दुचाकीवरून निघालेल्या जोसेफनं तिला थांबवलं. दुचाकीवर तुला सोडतो असं सांगितलं. त्यानंतर दोघंही दुचाकीवरुन वरळी परिसरात आले. या ठिकाणी एका पार्किंग केलेल्या कारमध्ये जोसेफनं तिच्यावर बलात्कार केल्याचं तरुणीनं तक्रारीत म्हटलंय. दारूच्या नशेत असल्याचा गैरफायदा घेत जोसेफनं तिच्यावर बलात्कार केला. विरोध केला असता त्यानं मारहाण केल्याचं देखील पीडित तरुणीनं सांगितलं.

सहा दिवसांची पोलीस कोठडी : त्यानंतर आरोपी जोसेफ जेम्स झेविअर्स याला वरळी पोलिसांनी अटक केली. तसंच आरोपीला न्यायालयात हजर करण्यात आलं असता न्यायालयानं त्याला सहा दिवसांची पोलीस कोठडी आरोपीला सुनावली आहे, अशी माहिती वरळी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र काटकर यांनी दिली आहे.

## जेवणाची ऑर्डर लवकर देत नाही म्हणून हवेत गोळीबार, नाशिकमध्ये सिनेस्टाईल पाठलाग करत चौघांना बेड्या

■ **नाशिक: विशेष प्रतिनिधी**

हरसूल येथे एका हॉटेलात मद्यधुंद अवस्थेत जेवणासाठी गेलेल्या नाशिकसह परजिल्ह्यातील चार सराईत गुंडांनी गावठी पिस्तुलातून सात राऊंड हवेत फायर करून नाशिककडे पळ काढला. ही माहिती कळताच गंगापूर पोलिसांनी नाकाबंदी करून भरधाव इनोव्हा कार अडविण्याचा प्रयत्न केला. मात्र, संशयितांनी पोलिसांना न जुमानता पळ काढला. यानंतर चोर आणि पोलिसांचा खेळ सुरू झाल्यावर पळून जाणाऱ्या चौघा सराईतांचा पाठलाग करून गावठी पिस्तुलासह गजाआड करण्यात यश आले आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, इम्रान अयनूर शेख (२५, रा. गणेशचौक, संजीवनगर, अंबड लिंकरोड, नाशिक), शेखर दिलीपराव कथले (२९, रा. शिवाजीनगर ता. सेलू, जि. परभणी), अरबाज शब्बीर खान पठाण (२३, रा. डिग्रसवाडी, सेलू, जि. परभणी) व राहुल श्याम



क्षत्रिय (२४, रा. साईबाबा मंदिराच्या बाजूला, संत जनार्दननगर, नांदूरनाका, नाशिक) अशी अटक केलेल्या सराईत संशयितांची नावे आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी की, हरसूल येथील हॉटेल कश्यपी फोर्ट येथे चौघेही संशयित मद्य पिऊन जेवण करण्यासाठी आले. त्यांनी हॉटेलात ऑर्डर देऊन जेवण केले. यानंतर काहीतरी ऑर्डर दिल्यावर ती लवकर का आणली नाही, यातून वाद घालत एकाने जवळील गावठी पिस्तुलातून हॉटेलचा मॅनेजर आणि वेटरच्या समोर सात राऊंड हवेत फायर केले.

**चौघे इनोव्हातून पसार**

त्यानंतर धाकाने चौघे इनोव्हात बसून नाशिकच्या दिशेने पळाले. ही माहिती हरसूल पोलिसांना कळविण्यात आली. त्यांनी गुन्ह्याचा तपास करताना गंगापूर पोलिसांना संशयित नाशिकमार्गे येत असल्याची माहिती दिली. त्यानुसार गंगापूर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ निरीक्षक तृप्ती सोनवणे यांनी डीबीचे उपनिरीक्षक मोतीलाल पाटील, हवालदार रवींद्र मोहिते, गणेश रेहरे, सचिन काळे आदींना नाकाबंदीसह संशयितांना पकडण्याचे आदेश दिले.

त्यानुसार, एमएच २० सीए ९५९५ ही संशयास्पद इनोव्हा गिरणारे येथून गंगापूर रोडकडे येत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पथकाने गंगापूर जकात नाक्याजवळ इनोव्हा थांबविण्याचा प्रयत्न केला. तेव्हा संशयित चालकाने कार न थांबविता पळून जाण्याचा प्रयत्न केला. तेव्हा पोलिसांनी डीबी मोबाइल कारने पाठलाग करून इनोव्हा गंगापूर गाव जकात नाक्याजवळ अडविली. तेव्हा चौघांनी पळून जाण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांचा पाठलाग करून पकडण्यात आले. या कारवाईत इनोव्हा कार, एक पिस्तूल हस्तगत करण्यात आली आहे.

## अवैधरीत्या गर्भपात जाळे चालवणारी आशा कार्यकर्तीसह तिघे अखेर गजाआड

■ **छत्रपती संभाजीनगर: विशेष प्रतिनिधी**

वाळूजनजीकच्या बकवालनगरात आशा कार्यकर्तीने चालविलेले गर्भपात प्रकरण गंगापूरच्या आरोग्य विभागाने जानेवारी महिन्यात उघडकीस आणले होते. यातील मुख्य आरोपी महिला कार्यकर्ती पसार होती. तिला पैठण तालुक्यातील रहाटगावातून अटक करण्यात आली असल्याची माहिती वाळूज पोलिसांनी दिली. अटक केलेल्या महिलेचे नाव वैशाली खींद्र जाधव



असे आहे. वैशाली जाधवने दिलेल्या कबुली जबाबानंतर पोलिसांनी शुक्रवारी सुनील लहुराव मेघारे, गणेश सोनाजी सवंडकर यांना अटक करण्यात आली आहे. या दोघाकडून गर्भपात करणाऱ्या गोळयांची कीट जप्त करण्यात आली. आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी गावपातळीवर आरोग्य विभागाने वैशाली जाधव या आशा कार्यकर्तीची नियुक्ती केली होती. मदर केअर बिल्डींगमधून सदर महिला सेवा देण्याचे काम करायची. यात केंद्रात गर्भलिंग निदान चाचणी करून महिलाचे गर्भपात केले जात असल्याची तक्रार काहींनी हेल्पलाईनव्दारे थेट पुणे येथील सबंधित विभागाकडे केली होती. तक्रार प्राप्त होताच गंगापूरचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. रमेश पवार यांच्या पथकातील डॉ. सुदाम लगास यांनी ३० जानेवारीला बकवालनगर पोलिसासह गाठले होते.

## घरात खजिना गाडल्याचे स्वप्नात दिसले,खोदकाम करताना कामगाराचा मृत्यू...

■ **नागपूर: विशेष प्रतिनिधी**

एकविसाव्या शतकातही अंधश्रद्धेचे प्रमाण काही कमी झाले नाही. अशाच एका प्रकरणात यवतमाळ जिल्ह्यातील एका व्यक्तीला स्वप्नात दिसले की त्याच्या घरात सोने गाडलेले आहे. त्याने कामगाराच्या मदतीने खोदकाम सुरू केले. मात्र दुर्दैवाने कामगाराचा खोदकाम करताना मृत्यू झाला. याप्रकरणी पोलिसांनी जादूटोणा कायद्याच्या अंतर्गत संबंधित आरोपीवर गुन्हा दाखल केला. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने आरोपीला अटकपूर्व जामीन मंजूर केला. हितेश रामजीभाई कारिया (रा. कारंजा लाड , जि. यवतमाळ) असे जामीन मिळालेल्या आरोपीचे नाव आहे. तर देवराम भाडूकले असे मृतक कामगाराचे नाव आहे.आरोपी हितेश याला स्वप्न पडले होते कीकारंजा लाड येथील घरी सोने गाडले आहे. त्यामुळे त्याने खोदकाम करण्याकरिता मृतक देवराव आणि इतर मजुरांना आणले होते. सोने मिळविण्याच्या नादात हितेशने कामगारांना खोलवर खोदकाम करायला लावले. खोदकाम करण्याच्या उत्साहात निष्काळजीपणा अंगावर भिंत पडून देवराव यांचा मृत्यू झाला. दारव्हा पोलिसांनी आरोपी हितेश व इतर सह आरोपीविरूद्ध



जादूटोणा कायद्याच्या अंतर्गत गुन्हा दाखल केला. आरोपीने घरी गाडलेले सोने काढण्याकरिता देवराव यांना खोदकाम करण्यासाठी बोलविले होते. या खोदकामादरम्यान देवराव यांच्या अंगावर भिंत पडून त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणात आरोपीचा निष्काळजीपणा असला तरी आरोपीला ताब्यात घेण्याची गरज नाही, असा युक्तिवाद आरोपीच्यावतीने करण्यात आला. सरकारी पक्षाने जामिनाला विरोध करताना सांगितले की आरोपी गैरकायदेशीर कृत्यात सहभागी आहे. आरोपीने घरी सोने शोधण्याकरिता खोदकाम केले आहे. आरोपीच्या निष्काळजीपणामुळे ही घटना घडली असून खोदकाम करताना देवराव यांच्या अंगावर भिंत पडून मृत्यू झाला आहे. त्यामुळे आरोपीच्या चौकशीचा गरज आहे. गुन्हा दाखल झाल्यापासून आरोपी फरार आहे. त्यामुळे आरोपीला जामीन देवू नये, अशी विनंती सरकारी पक्षाने न्यायालयात केली.

दरम्यान आरोपीने केवळ सोने शोधण्यासाठी व खोदकाम करायला देवराव यांना बोलविले होते. या प्रकरणाचा तपास पूर्ण झाला असून यात नव्याने चौकशी करण्यासाठी काही नाही असे म्हणत न्यायालयाने आरोपीला अटींसह अटकपूर्व जामीन मंजूर केला.

## गोवंशीयांची कत्तल करणारी टोळी जेरबंद! गुन्हेशाखा युनिट दोनची कामगिरी

■ **नाशिक: विशेष प्रतिनिधी**

भद्रकाली हद्दीत एका पत्र्याच्या शेडमध्ये गोवंशीय जनावरांच्या अनधिकृत कत्तलखान्यावर शहर गुन्हेशाखेच्या युनिट दोनच्या पथकाने छापा टाकला. यावेळी पोलिसांनी तब्बल १४०० किलो गोवंशीय मांस जप्त केले तर, डांबून ठेवलेली २० गोवंश जनावरांची सुटका करीत वाहने असा सुमारे साडेपाच लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी संशयित १३ जणांना अटक केली असून, मोठी टोळी पोलिसांच्या हाती लागली आहे.

पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांनी गोवंश कत्तल व तस्करीला आळा घालण्याचे आदेश दिलेले आहेत. शहर गुन्हेशाखेच्या युनिट दोनचे वरिष्ठ निरीक्षक विद्यासागर श्रीमनवार यांच्या पथकाला मध्यरात्री गोवंश कत्तलीसंदर्भातील गोपनीय खबर मिळाली होती. त्यानुसार, उपनिरीक्षक अजय पगारे, सहायक उपनिरीक्षक यशवंत बेंडकुळे, बाळू



शेळके, विवेक पाठक, अंमलदार प्रकाश भालेराव, नंदकुमार नांदुर्डीकर, अतुल पाटील, जितेंद्र वजीर यांच्या पथकाने भद्रकाली पोलिसांच्या मदतीने तिग्रारानीया रोडवरील सागर बेकरीसमोर असलेल्या रजा नुरी इलेक्ट्रीकल गोडाऊनच्या मागे बंद असलेल्या पत्र्याच्या शेडमध्ये सुरू असलेल्या अनधिकृत कत्तलखान्यावर छापा टाकला. यावेळी बेकायदेशीरपणे काही गोवंशांची कत्तल करुन मांस लपविल्याचे आढळून आले. तसेच, एका बाजुला २० गोवंश जनावरे डांबून ठेवलेले होते. संशयितांना ताब्यात घेत त्यांच्याविरुद्ध भद्रकाली पोलिसांत महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम व प्राण्यांना क्रुरतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अमीन अय्युब कुरेशी (२६, रा. बागवान पुरा), जुनेद नजीर कुरेशी (२१), अमीन नासीर पठाण (२०, दोघे रा. नानावली), ईस्माईल अनिस कुरेशी (२५, रा. पंचशिल नगर), रिजवान सुलेमान कुरेशी (२९).

## मोहोळजवळील स्मशानभूमीत जादूटोण्याचा अघोरी प्रकार उजेडात, महिलेसह दोघांविरुद्ध गुन्हा दाखल'

■ **सोलापूर विशेष प्रतिनिधी**

**मोहोळ तालुक्यातील टाकळी सिकंदरसारख्या साखर पट्ट्यात स्मशानभूमीमध्ये जादूटोणा, करणी, भानामतीच्या नावाखाली अघोरी प्रकार उजेडात आला असून याप्रकरणी एका महिलेसह दोघाजणांविरुद्ध जादूटोणा प्रतिबंधक कायद्याखाली मोहोळ पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.**

मनीषा बबन खांडेकर आणि ज्ञानेश्वर लोंढे (दोघे रा. टाकळी सिकंदर) अशी या गुन्ह्यातील आरोपींची नावे आहेत. या घटनेमुळे टाकळी सिकंदर गावासह आसपासच्या भीमा नदीकाठच्या गावांमध्ये भोळ्या भाबड्या ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

यासंदर्भात याच गावात राहणाऱ्या सीमा सिद्धेश्वर परबतराव (वय ४०) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार काही दिवसांपूर्वी सीमा यांच्या मुलाने दारूच्या नशेत मनीषा खांडेकर हिला शिवीगाळ केली होती. त्यातून त्यांच्यात भांडण झाले होते. त्यावेळी मनीषा खांडेकर हिने सीमा यांच्या मुलाला शिव्याशाप दिला होता. योगायोगाने पुढे थोड्याच दिवसांत दारूच्या नशेत सीमा यांच्या मुलाने गळफास घेऊन आत्महत्या केली होती. या घटनेमुळे सीमा परबतराव यांना मनीषा खांडेकर ही जादूटोणा करीत असल्याचा संशय आला. त्यांनी तिला जाब विचारत, तू जादूटोणा आणि करणी, भानामती करतेस. त्यामुळेच माझ्या मुलाचा जीव गेला, असा आरोप करून वाद घातला होता. त्यातून



त्यांच्यात पुन्हा भांडण झाले होते. याच पार्श्वभूमीवर मनीषा खांडेकर आणि तिचा साथीदार ज्ञानेश्वर लोंढे हे दोघे सीमा परबतराव यांच्यासह वैर असलेल्या अन्य ग्रामस्थांची छायाचित्रे गोळा करून गावातील स्मशानभूमीत नेली आणि त्या सर्व छायाचित्रावर, सर्व संबंधितांचा व्यवसाय बुडावा, त्यांचे आर्थिक नुकसान व्हावे अशा आशयाचा मजकूर लिहून सर्व छायाचित्रे जाळली आणि राख एका टोपलीमध्ये भरून त्यात मांस, लिंबू, काळा दोरा आदी जादूटोणा करण्याचे साहित्य ठेवून अनिष्ठ, जादूटोणा, करणी-धरणीसारखे अघोरी कृत्य केले.

गावकऱ्यांनीच हा प्रकार उजेडात आणला. याप्रकरणी मोहोळ पोलीस ठाण्यात मनीषा खांडेकर व तिच्या साथीदाराविरुद्ध महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियमाखाली फौजदारी गुन्हा दाखल झाला आहे.

## गुंगीचे पेय देऊन लैंगिक अत्याचार, तीन कॉफी शॉपची युवा शिवप्रतिष्ठानकडून तोडफोड

■ **सांगली: विशेष प्रतिनिधी**

अल्पवयीन मुलीला कॉफीमधून गुंगीचे औषध देउन लैंगिक अत्याचाराचा प्रकार समोर आल्यानंतर युवा शिवप्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी शुक्रवारी सांगलीतील तीन कॉफी हाउसवर हल्लाबोल करत प्रचंड तोडफोड केली. काही कॉफीशॉपमध्ये अनैतिक प्रकार घडत असून संघटनेने कारवाईची सातत्याने केली होती. मात्र, प्रशासकीय दुर्लक्षानंतर प्रकार समोर आल्याने संतप्त कार्यकर्त्यांनी शुक्रवारी टोकाचे पाउल उचलले. या प्रकरणी पोलीसांनी १६ जणांना ताब्यात घेतले आहे. विश्रामबागमधील शंभरफुटी रस्त्यावर असलेल्या एका कॅफेमध्ये एका अल्पवयीन मुलींला नेऊन तिला गुंगीचे पेय देउन चित्रीकरण केले. या आधारे लैंगिक अत्याचार झाल्याची तक्रार संबंधित पिडीतेने दिली. या प्रकरणी संशयित तरूण आशिष चव्हाण याला पोलीसांनी अटक केली आहे.




दरम्यान, कॉपी शॉपमध्ये गैरप्रकार होत असून याचा बंदोबस्त करण्याची वारंवार मागणी युवा शिवप्रतिष्ठानच्यावतीने पोलीस ठाण्याकडे निवेदनाद्वारे केली होती. मागणी केल्यानंतर अशा प्रकारांना काही प्रमाणात आळा बसत होता. मात्र, त्यानंतर असे प्रकार घडत असल्याच्या तक्रारीही होत्या. नव्याने हा प्रकार समोर आल्यानंतर आज विश्रामबाग परिसरातील तीन कॉफी शॉपवर युवा शिवप्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी कॅफेमध्ये घुसून आतील साहित्याची मोडतोड करत फलकाचे नुकसान केले. कॅफेमधील खुर्च्या, पडदे, टेबल बाहेर आणून मोडून टाकण्यात आले. शहरातील कॅफे हँग ऑन, सन शाईन कॅफे, कॅफे डॅनिस्को या विश्रामबाग परिसरातील तीन कॅफेमध्ये घुसून जोरदार तोडफोड केली. या तोडफोड प्रकरणी युवा शिवप्रतिष्ठानच्या १६ कार्यकर्त्यांना पोलीसांनी ताब्यात घेतले आहे.

## अमली पदार्थ तस्करीच्या गुन्ह्याची भीती घालून लाखोंची सायबर फसवणूक, आरोपीला राजस्थानवरून अटक

■ **मुंबई: विशेष प्रतिनिधी**

अमली पदार्थ तस्करीप्रकरणात गुन्हा दाखल झाल्याची भीती घालून फसवणूक करणाऱ्या भामट्याला राजस्थान येथून अटक करण्यात ओशिवरा पोलिसांना यश आले. अटक आरोपीने मुख्य आरोपींना सायबर फसवणुकीसाठी मदत केल्याचा आरोप आहे. आरोपीने तक्रारदाराची साडेआठ लाख रुपयांची फसवणूक केली आहे.

शिशुपाल शर्मा असे आरोपीचे नाव आहे. तक्रारदार व्यावसायिक असून त्यांना फेब्रुवारीमध्ये एक दूरध्वनी आला होता. दूरध्वनी करणाऱ्या व्यक्तीने तो कुरियर कंपनीतून बोलत असल्याचे भासवले. त्यानंतर दूरध्वनी करणाऱ्या व्यक्तीने तक्रारदारांना नाव व माहिती विचारली. 'मरियम' नावाने विमानतळावर तुमची काही वस्तू असून त्यात अमली पदार्थ आहेत. याप्रकरणात आरोपीने त्यांचा सायबर पोलीस अधिकाऱ्याशी संपर्क साधून दिला. त्याने त्याचे नाव प्रदीप सावंत असे सांगून स्काईप आयडीवर व्हॉइस कॉल करण्यास सांगितला. कारवाईची भीती दाखवून आरोपीने त्यांना त्याच्या खात्यात साडेआठ लाख रुपये जमा करण्यास सांगितले. पोलीस अधिकारी समोर न येता परस्पर पैशांची मागणी करीत असल्यामुळे तक्रारदारांना संशय




आला. त्याने ओशिवरा पोलीस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी गुन्हा नोंदविला. तपासादरम्यान पोलिसांना बँक खात्याची माहिती मिळाली. त्या माहितीच्या आधारे पोलिसांचे पथक राजस्थान रवाना झाले. पोलिसांनी तेथून शिशुपालला ताब्यात घेऊन अटक केली. शिशुपालचे औषधाचे दुकान आहे. मुख्य आरोपींनी त्याला काही पैसे खात्यात येणार असल्याचे सांगितले होते. त्यामुळे शिशुपालने त्याचे बँक खाते वापरायला दिले होते. पोलिसांनी तपास करून फसवणूक झालेली रक्कम गोठवली आहे. फसवणुकीच्या गुन्ह्यात शिशुपालला अटक करण्यात आली असून याप्रकरणी ओशिवरा पोलीस अधिक तपास करत आहेत.

# रायगडमधील १०३ गावांना दरडींचा धोका, दरडग्रस्त गावांचे भुवैज्ञानिकांकडून सर्वेक्षण

■ अलिबाग: रघुवीर जाधव

भुवैज्ञानिकांनी केलेल्या सर्वेक्षणात रायगड जिल्ह्यातील १०३ गावांना दरडी कोसळण्याचा धोका असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे या संभाव्य दरडग्रस्त गावांना पावसाळ्याच्या पार्श्वभुमीवर सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. दरडग्रस्त गावात प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे निर्देश जियोलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाच्या वैज्ञानिकांनी दिले आहेत. जिल्ह्यात २००५ मध्ये झालेल्या भुस्खलनाच्या घटनांमध्ये २१२ हून अधिक जणांचा मृत्यू झाला होता. २०२१ मध्ये तळीये गावावर दरड कोसळली होती. ज्यात ८४ जणांचा मृत्यू झाला होता. तर गेल्या वर्षी इरशाळवाडी येथे दरड कोसळून ८४ जण दगावले होते. सातत्याने होणाऱ्या या घटनेची दखल घेऊन जिल्ह्यातील संभाव्य दरडग्रस्त गावाचे जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाच्या भूवैज्ञानिकांमार्फत सर्वेक्षण करण्ययात आले होते. यात प्रामुख्याने डोंगर उतारावरील गावांचा समावेश होता. नैसर्गिक धोके सौम्यीकरण पथदर्शी प्रकल्पा आंतर्गत ही पहाणी करण्यात आली होती. या आंतर्गत सरवातीला जिल्ह्यातील ८४ गावांचा दरडग्रस्त गावांमध्ये समावेश करण्यात आला होता. मात्र आता ही संभाव्या दरडग्रस्त गावांची संख्या १०३ वर पोहोचली आहे. रायगडमधील ९ गावे (वर्ग १) अतिधोकादायक, ११ गावे (वर्ग २) धोकादायक व ८३ गावे वर्ग ३) सौम्या धोकादायक आहेत.

डोंगर उताररावरील वृक्ष तोड, बेकायदा खोदकाम, पाण्याचा निचरा होणाऱ्या मार्गात अडथळे, पावसाळी हंगामात जमिनीस भेगा पडणे, अस्थिर भूभागावरील बांधकाम ही दरड कोसळण्याची प्रमुख कारण आहेत असल्याचे या सर्वेक्षणात दिसून आले आहे. पुणे येथील भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण (जीएसआय) विभागाच्या शास्त्रज्ञांनी या गावांना भेट देऊन पहाणी केली. या पहाणीत शास्त्रज्ञांच्या अनेक धक्कादायक बाबी नजरेसमोर आल्या आहेत. त्याचा अहवाल शासनाला पाठविण्यात आला आहे. दरम्यान १०३ दरडग्रस्त गावांमध्ये अनेक उपाययोजना करण्यात याव्यात यासाठी भूवैज्ञानिकांनी काही सुचना केल्या आहेत. त्यांची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील संभाव्य दरडग्रस्त गावांमधील धोका कमी करण्यासाठी भूवैज्ञानिकांनी काही उपाययोजना सुचविल्या आहेत. यात प्रामुख्याने या परीसरातील खाणकाम आणि उत्खननावर निर्बंध घालण्यात यावे, डोंगर उतारावर वृक्ष तोडण्यास मज्जाव करण्यात यावा, पावसाळ्यापुर्वी डोंगर उतारवर सैल झालेले दगड हटवण्यात यावेत.



## शांतीगिरी महाराज पुन्हा अडचणीत, मतदान केंद्रावरील 'त्या' कृतीमुळे गुन्हा दाखल

■ नाशिक: विशाल कारंडे

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातील १३ जागांसाठी आज मतदान होत आहे. सकाळी सात वाजल्यापासून मतदानाला सुरुवात झाली आहे. आपला





हक्क बजावण्यासाठी अनेकांनी सकाळी लवकर मतदान केंद्र गाठलं. नाशिक लोकसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार शांतीगिरी महाराज यांनीही सकाळी लवकर मतदान केलं. त्यांच्यामुळे नाशिकमध्ये तिरंगी लढत होत आहे. सोमवारी मतदानाला सुरुवात होताच शांतीगिरी महाराज नाशिकमधील मतदान केंद्रावर पोहोचले. त्यांनी मतदान करण्याआधी ईव्हीएम ठेवण्यात आलेल्या पोलिंग बूथला पुष्पहार घातला. महाराज पोलिंग बूथला हार घातल्याचा व्हिडीओ समोर आला आहे. यासंदर्भात तक्रार झाल्यास शांतीगिरी महाराजांच्या अडचणी वाढू शकतात.

याआधी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्याविरोधात अशाच प्रकरणात गुन्हा दाखल झाला आहे. त्यांनी पुण्यात ईव्हीएमची पूजा केली होती. त्यावरुन चाकणकर यांच्यावर बरीच टीका झाली होती. आता शांतीगिरी महाराजांच्या अडचणी वाढणार का याकडे सगळयांचं लक्ष लागलं आहे. मतदानाचा हक्क बजावल्यानंतर शांतीगिरी महाराजांनी माध्यमांसोबत संवाद साधला. भाजपसह सर्व हिंदुत्त्ववादी संघटनांचा आपल्याला पाठिंबा आहे. त्यामुळे विजय आमचाच होणार, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यंदाची निवडणूक आम्हाला जिंकायची आहे. मतदार आम्हाला भरभरुन मतदान करतील, असं महाराज म्हणाले. ईव्हीएमला हार का घातला, असा प्रश्न महाराजांना विचारण्यात आला. त्यावर मतदान पवित्र आहे. या यंत्राजवळ मतदार मतदान करणार आहेत. त्यामुळे सगळयांना सद्बुद्धी व्हावी. त्यांचं मत भारतमातेच्या कामी यावं म्हणून ईव्हीएमला हार घातल्याचं त्यांनी सांगितलं.

## सुप्रिया सुळेंना मुख्यमंत्री करण्याचा शरद पवार-उद्धव ठाकरेंचा झाला होता समझोताः अजितदादांच्या प्रवक्त्याचा मोठा गौप्यस्फोट

■ सांगली: संजीनी खाडे

राज्यात महाविकास आघाडीच्या काळात उद्धव ठाकरे यांच्यानंतर अडीच वर्षांनी सुप्रिया सुळे यांना मुख्यमंत्री करण्याबाबत पक्षाध्यक्ष शरद पवार व शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यात गुप्त समझोता झाला होता. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडण्याचे ते एक महत्त्वाचे कारण असल्याचा दावा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) चे राज्य प्रवक्ते उमेश पाटील यांनी केला.शरद पवार यांनी, अजित पवार सक्षम नव्हते आणि छगन भुजबळ यांना मुख्यमंत्री केल्यास पक्ष फुटेल, अशी स्थिती असल्याने पक्षाला मुख्यमंत्रिपद घेतले नसल्याचे म्हटले आहे. यावर पाटील यांनी आज सांगलीत पत्रकार परिषदेत पवार यांच्या दाव्याला उत्तर दिले.पाटील म्हणाले, "सन २००४ मध्ये काँग्रेसहून अधिक आमदार निवडून येऊनही सक्षम नेता नसल्याने शरद पवारांनी राष्ट्रवादीकडे मुख्यमंत्रिपद घेतले नाही. मग, महाविकास आघाडी सरकारमध्ये ग्रामपंचायत सदस्य पदापासून कसल्याही संसदीय कामकाजाचा अनुभव नसलेले उद्धव ठाकरे कसे मुख्यमंत्रिपदी चालले." उमेश पाटील म्हणाले, अजित पवार तीनवेळा आमदार, एकदा खासदार झाले. विजयसिंह मोहिते-पाटील, छगन भुजबळ, पद्मसिंह पाटील, आर. आर. पाटील, जयंत पाटील, सुनील तटकरे, प्रफुल्ल



पटेल यांच्यासारखे ज्येष्ठ नेते होते. ते मुख्यमंत्रिपदाला सक्षम नव्हते का? भुजबळ यांना मुख्यमंत्री केले असते तर पक्षात फूट पडली असती. यामागे जातीय संदर्भ होता का? त्यांच्यावर दबाव होता का? हे स्पष्ट झाले पाहिजे. सन २०१९ मध्ये अडीच वर्षांनी सुप्रिया सुळे यांना मुख्यमंत्री करण्याबाबत शरद पवार व उद्धव ठाकरे यांच्यात गुप्त समझोता झाला होता. त्याची माहिती काँग्रेसला नव्हतीच, पण राष्ट्रवादीच्या नेते आणि आमदारांनाही नव्हती. पक्षफुटीचे तेही एक कारण होते. एकनाथ शिंदे यांच्या मुख्यमंत्री पदाला अजित पवार, दिलीप वळसे-पाटील, सुनील तटकरे यांचा विरोध होता, असे वक्तव्य शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी केले आहे. त्याबाबत बोलताना राज्य प्रवक्ते पाटील म्हणाले, खासदार राऊत खोटी माहिती देत आहेत. शिंदे यांना कुणीही विरोध केला नव्हता. उलट उद्धव ठाकरे यांच्या पत्नी रश्मी यांनी पुत्रप्रेमापोटी आदित्य यांना मुख्यमंत्री करण्याचा घाट घातला होता. आदित्य यांच्या नेतृत्वात कुणीही काम करण्यास तयार झाले नसते. त्यामुळेच सरकार चालविण्याचा कसलाही अनुभव नसताना उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्री केले. राष्ट्रवादीच्या प्रदेश सरचिटणीस जयश्री पाटील, जिल्हाध्यक्ष राधिका हारगे, वसीम नायकवडी, तौफिक फकीर, उषाताई गायकवाड आदी उपस्थित होते.

## कांदिवलीतील फ्लॅटमध्ये आढळले पती-पत्नीचे मृतदेह; धक्कादायक घटनेनं परिसरात खळबळ

■ मुंबई: सचिन कदम

मुंबईतून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. कांदिवली परिसरातील एका फ्लॅटमध्ये पती-पत्नीचे मृतदेह आढळून आले आहेत. प्रमोद चोणकर (वय ६१) आणि अर्पिता चोणकर (वय ५७) अशी मृतांची नावे आहेत.

या घटनेनं परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. दोघांचेही मृतदेह सडण्यास सुरुवात झाली होती. फ्लॅटमधून दुर्गंधी येत असल्याने स्थानिकांनी या घटनेची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी दरवाजा तोडून आतमध्ये प्रवेश केला असता, प्रमोद यांचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. तर अर्पिता या बेडवर मृतावस्थेत आढळून आल्या. दोघांनीही आत्महत्या केल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. या दुहेरी आत्महत्येमागील अधिकृत कारण समजू शकले नाही.

मात्र, आर्थिक विवंचनेमुळे मानसिक नैराश्येतून त्यांनी आत्महत्या केल्याचे बोलले जात आहे. पोलिसांना घटनास्थळी एक सुसाइड नोटही सापडली आहे. त्यात वृद्ध जोडप्याने




स्वत:च्या इच्छेने आत्महत्या केल्याचे लिहिले आहे. मृत प्रमोद वासुदेव चोणकर आणि अर्पिता प्रमोद चोणकर हे कांदिवलीच्या अनुभूती सोसायटीच्या आर्य चाणक्य नगरमध्ये राहत होते. मूलबाळ नसल्याने दोघेही एकाकी जीवन जगत होते. गेल्या दोन-तीन दिवसांपासून प्रमोद आणि त्यांच्या पत्नी सोसायटीतील रहिवाशांना दिसले नाहीत. गुरुवारी त्यांच्या फ्लॅटमधून दुर्गंधी येत असल्याने अनेकांना संशय आला. त्यांनी याची माहिती समतानगर पोलिसांना दिली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस पोलीस घटनास्थळी पोहोचले.

## 'ऑनलाइन रमीच्या व्यसनामुळे सचिन तेंडुलकरच्या अंगरक्षकाची आत्महत्या?', बच्चू कडू पुन्हा एकदा आंदोलन करणार

■ मुंबई: राकेश गायकवाड

ऑनलाइन रमीच्या व्यसनातूनचा सचिन तेंडुलकरच्या अंगरक्षकाची आत्महत्या झाल्याचा दावा बच्चू कडू यांनी केला आहे. 'ऑनलाइन गेममुळे तेंडुलकर यांच्या अंगरक्षकानं आत्महत्या केली. हे निषेधार्थ आणि संताप आणणारं आहे. सचिन तेंडुलकर यांनी ऑनलाइन रमीची जाहीरात बंद करावी किंवा भारतरत्न पुरस्कार सोडावा. नाही तर ६ जून शिवराज्यभिषेक



दिनाच्या दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी ७ जून सचिन तेंडुलकर यांच्या घरासमोर त्यांचा पुतळा जाळून आंदोलन करणार', असे आव्हान बच्चू कडू यांनी पुन्हा एकदा दिले आहे. याआधीही बच्चू कडू यांनी सचिन तेंडुलकरच्या विरोधात आंदोलन केले होते.

बच्चू कडू माध्यमांशी बोलताना म्हणाले की, जो अंगरक्षक सचिन तेंडुलकरचे जीव वाचविण्याचे काम करत होता, त्याच अंगरक्षकाला सचिन करत असलेल्या जाहिरातीमुळे जीव गमवावा लागला आहे. अंगरक्षकाला आत्महत्या करायची वेळ अली असेल तर सचिन तेंडुलकरने ही जबाबदारी उचलली पाहीजे. ज्याला भारतरत्न म्हणून आपण गौरविले, त्याच्या जाहिरातीमुळे अशी आत्महत्या करावी लागत असेल तर हे दुर्दैव आहे. भारताचा माजी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरच्या सुरक्षा व्यवस्थेतील राज्य राखीव पोलीस दलाच्या (एसआरपीएफ) अंगरक्षक जवानाने १५ मे रोजी पहाटे जामनेर येथील निवासस्थानी डोक्यात गोळी झाडून आत्महत्या केली होती. गेल्या १५ वर्षांपासून राज्य राखीव पोलीस दलाच्या सेवेत असलेले प्रकाश कापडे (३९) यांनी याआधी मंत्री छगन भुजबळ, केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्याकडेही सुरक्षाव्यवस्थेतील अंगरक्षक म्हणून काम केले होते. सध्या ते सचिन तेंडुलकरच्या मुंबई येथील निवासस्थानी सुरक्षाव्यवस्थेत अंगरक्षक म्हणून तैनात होते. आठवडाभरापूर्वी ते जामनेर येथील गणपतीनगर भागातील आपल्या निवासस्थानी परतले होते. कापडे यांनी आत्महत्या केल्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला होता.

## शाळेच्या आवारातच १६ वर्षीय मुलाची आत्महत्या; झाडाला दोरी बांधून घेतला गळफास

■ जळगाव: सचिन कदम

चाळीसगाव तालुक्यातील दडपिंप्री गावात राहणाऱ्या एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलाने आत्महत्या केली. या मुलाने जिल्हा परिषद मराठी शाळेच्या आवारातील झाडाला दोरीने गळफास घेऊन जीवन संपवले. ही बाब परिसरातील काही



तरूणांच्या लक्षात आल्याने त्यांनी तातडीने धाव घेऊन त्याला खाली उतरवून तातडीने मेहुणबारे ग्रामीण रूग्णालयात दाखल करण्यात आले. अमोल सुरेश राठाडे (वय १६, रा. दडपिंप्री ता. चाळीसगाव) असे मृत मुलाचे नाव आहे. अमोल राठोड हा मुलगा आपल्या कुटुंबासह दडपिंप्री गावात वास्तव्याला होता. शनिवारी सकाळी साडे अकराच्या सुमारास गावातील जिल्हा परिषद शाळेच्या आवारात असलेल्या झाडाला दोरीने गळफास घेऊन आत्महत्या करण्यात आली. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी केल्यानंतर त्याला मृत घोषित करण्यात आले. दरम्यान, अमोल राठाडे या मुलाने आत्महत्या नेमकी का केली याचे कारण समोर आलेले नसून, याप्रकरणी सायंकाळी पाच वाजता मेहुणबारे पोलिसांत आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

## क्रौर्याचा कळस! पत्नीच्या गुप्तांगाला लावले कुलूप, खिळयाने पाडले छिद्र; मनोविकृत पती गजाआड

■ मुंबई: विशेष प्रतिनिधी

पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत नराधम पतीने तिच्या गुप्तांगाला अक्षरश: खिळ्याने छिद्र पाडून कुलूप लावले. त्यानंतर कुलुपाची चावी फेकून दिली. आठवडाभर पत्नीने असहाय वेदना सहन केल्यानंतर अखेर रूग्णालय गाठले. त्यानंतर हा विकृत प्रकार समोर आला आहे. ही घटना वाकड येथे उघडकीस आली आहे. याप्रकरणी २८ वर्षीय पत्नीने वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार, ३० वर्षीय पतीला अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिला आणि तिचा पती मुळचे नेपाळचे आहेत. आरोपी पतीची बहिण आणि मेहूणे वाकड – सुर्या अंडरपास येथे वास्तव्यास आहेत. आरोपीचे मेहूणे एका गॅरेजमध्ये कामाला आहेत. आरोपी पतीला दारूचे व्यसन आहे. आरोपी काहीच काम-धंदा करीत नाही. या दाम्पत्याला पाच आणि तीन वर्षीय



दोन मुली आणि नऊ महिन्याचा एक मुलगा आहे. दरम्यान, आरोपी पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन आरोपी पती पत्नीला वारंवार मारहाण करत होता.

भाऊ काहीच काम करीत नसल्याने बहिणीने त्याला पुण्यात बोलावून घेतले. सात ते आठ दिवसांपूर्वीच हे दाम्पत्य वाकड येथे आले होते. बहिणीच्या घराशेजारीच आरोपी राहत होता. वाकड येथे आल्यानंतर या दाम्पत्यामधील वाद अधिक वाढला. चारित्र्याच्या संशयावरून आरोपी हा पत्नीला सतत मारहाण करू लागला. दि. ११ मे रोजी रात्री दहाच्या सुमारास त्याने पुन्हा पत्नीला चारित्र्याच्या संशयावरून मारहाण केली. पत्नीच्या ब्लेडने गुप्तांगावर वार करून तिला गंभीर जखमी केले. यावर न थांबता त्याने पत्नीला चाकूचा धाक दाखवून जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर पत्नीला ओढणीच्या सहाय्याने बांधून पतीने लोखंडी खिळयाने पत्नीच्या गुप्तांगाला छिद्र पाडले आणि कुलूप लावले. गेले आठवडाभर विवाहितेने सर्व त्रास अंगावर काढला. असहाय वेदना होऊ लागल्यानंतर अखेर तिने महापालिकेचे यशवंतराव चव्हाण रूग्णालय गाठले. त्यानंतर हा अमानवी प्रकार समोर आला. हा प्रकार उघडकीस येताच पोलिसांनी आरोपी पतीला बेड्या ठोकल्या. या प्रकरणाचा पुढील तपास फौजदार बालाजी मेटे तपास करीत आहेत. विकृत पतीने ११ मे रोजी विवाहितेच्या गुप्तांगावर ब्लेडने वार केले. गुप्तांगाला छिद्र पाडून कुलूप लावले. त्यानंतर त्याने चावी फेकून दिली. सहा दिवस पत्नीने त्रास सहन केला. मात्र, जखमांमध्ये इन्फेक्शन होऊन जखमा चिघळण्यास सुरूवात झाली. वेदना सहन करण्याच्या पलीकडे गेल्यानंतर पत्नीने रूग्णालयात धाव घेतली.

## 'अनेकांची विकेट काढायची आहे', ठाण्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची फटकेबाजी

■ ठाणे: तृप्ती गोरे

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्याच्या प्रचाराची रणधुमाळी संपल्यानंतर मतदानाच्या पूर्वसंध्येला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यात क्रिकेटचा आनंद लुटला. 'मैदानावर जोरदार फटकेबाजी केल्यानंतर उद्या बऱ्याच लोकांची विकेट काढायची आहे, म्हणून मी आज क्रिकेट खेळलो,' असा टोला विरोधकांना लगावला. प्रचाराचा क्षीण घालवत शिंदे यांनी केलेली फटकेबाजी पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती.ठाणे लोकसभेत दोन्ही शिवसेना एकमेकांविरुद्ध उभ्या ठाकल्याने लढत प्रतिष्ठेची झाली आहे. शनिवारी सायंकाळी प्रचाराच्या तोफा थंडावताच



राजकीय नेते, उमेदवार छुप्या बैठकांना लागले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी शिवसेनेचे दिवंगत ठाणे जिल्हाप्रमुख आनंद दिघे यांच्या 'शक्तिस्थळ' या समाधीवर अभिवादन केले. त्यानंतर येथील मैदानात क्रिकेट खेळणाऱ्या तरुणाईत शिंदे सामील झाले. त्यांनी बॅट हातात घेत फटकेबाकी केली. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना उद्या बऱ्याच लोकांची विकेट काढायची आहे, म्हणून मी आज क्रिकेट खेळलो, असा टोला लगावला. तत्पूर्वी ठाणे व कल्याण लोकसभेचे महायुतीचे उमेदवार नरेश म्हस्के आणि डॉ. श्रीकांत शिंदे यांच्यासोबत टेंभीनाका येथील आनंदाश्रमात निवडणुकीच्या तयारीसंदर्भात तासभर चर्चा केली.

## धक्कादायक.. प्रेयसीने मोबाईल नंबर ब्लॉक केल्याच्या रागातून प्रियकराने झाडल्या बहिणीवर गोळया

■ पुणे: विशेष प्रतिनिधी

पुण्यातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. प्रेयसीने मोबाईल नंबर ब्लॉक करून संपर्क तोडल्याच्या रागातून तरुणाने तिच्या बहिणीवर गोळ्या झाडल्याची धक्कादायक घटनाघडली आहे. ही घटना पुण्यातील गंज पेठेतशनिवारी रात्री घडली. याप्रकरणी दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ऋषी बागुल असे आरोपीचे नाव आहे. ऋषी बागुल याच्या प्रेयसीने त्याच्याशी संपर्क कमी करुन त्याचा मोबाईल नंबर ब्लॉक केल्याने त्याला राग आला. तसेच ती न भेटल्यामुळे त्याचा राग अनावर झाला.तो शनिवारी रात्री २ वाजण्याच्या सुमारास मित्रासोबत त्याच्या प्रेयसीला भेटण्यासाठी तिच्या घरी गेला होता. मात्र प्रेयसी घराबाहेर न येता तिची बहिणी बाहेर आली. यावेळी प्रेयसीच्या बहिणीसोबत त्याचा वाद झाला. त्यानंतर संतापाच्या भरात त्याने जवळच्या पिस्टलमधून प्रेयसीच्या बहिणीवर गोळ्या झाडल्या. मला जर ती मिळाली नाही तर मी कोणालाही सोडणार नाही, अशी धमकीही त्याने यावेळी दिली. गोळीबार केल्यानंतर त्याने प्रेयसीच्या राहत्या घराला बाहेरुन कडी लावून तो व त्याचा मित्रा फरार झाले. या गोळीबारात प्रेयसीही किरकोळ जखमी झाली आहे.



या घटनेनंतर खडक पोलीस ठाण्यात ऋषी बागुल आणि त्याच्या साथीदाराविरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे. पोलीस याप्रकरणी अधिक तपास करत आहेत. पुणे शहरातील कल्याणीनगर परिसरात लक्झरी पोर्श कारने दुचाकीला धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात एक पुरुष आणि एक महिला अशा दोघांचा मृत्यू झाला. आज पहाटे तीन वाजताच्या सुमारास बॉलर पबजवळ हा अपघात घडला, अशी माहिती पोलिसांनी दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कारचालक अल्पवयीन असून तो एका नामांकित रिअल इस्टेट डेव्हलपरचा मुलगा आहे. पुणे शहराचे पोलिस उपायुक्त विजयकुमार मगर यांनी सांगितले की, अल्पवयीन मुलाने मद्यपान केले आहे की नाही? याची खातरजमा करण्यासाठी आम्ही त्याला वैद्यकीय तपासणीसाठी ताब्यात घेतले आहे.